डिजीटल ई-मासिक

महापशुधन वार्ता

वर्ष १ ले, अंक ७ वा

माहे नोव्हेंबर-२०२५

प्रकाशक: पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र राज्य

डिजीटल ई-मासिक

महापशुधन वार्ता

वर्ष १ ले, अंक ७ वा

संपादक

डॉ. देवेंद्र सुरेश जाधव
सहआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय
(पशुधन व नियोजन) पशुसंवर्धन आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे-६७

संकलन, संपादन, मांडणी व सजावट:
श्री. संतोष शिवराम पवार, पशुधन पर्यवेक्षक
'महापशुधन वार्ता' कक्ष, पसं-१३
पशुसंवर्धन आयुक्तालय, औंध, पुणे-६७

महाराष्ट्र शासन
पशुसंवर्धन आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे - ४११०६७

पशुसंवर्धन विभाग

मागील अंक वाचण्यासाठी खालील क्युआर कोड स्कॅन करा

Scan me for MAHAPASHUDHANVARTA

पशुसंवर्धन विभाग
राज्यस्तरीय कॉल सेंटर
संपर्क क्र : १९६२

पत्रव्यवहारासाठी पत्ता :
महापशुधन वार्ता कक्ष
पसं-१३, पशुसंवर्धन आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य,
औंध, पुणे - ४११००७

Email:
mahapshudhanvarta@gmail.com

या अंकातील लेखांमध्ये व्यक्त करण्यात आलेल्या मतांशी संपादक व पशुसंवर्धन विभाग सहमत असेलच, असे नाही (पुणे न्यायकक्षेत).

या अंकात...



- ❑ आधुनिक पशुवैद्यकीय सेवेकडे एक पुढचे पाऊल
- ❑ डॉ. रामास्वामी एन., (सचिव, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग) यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक
- ❑ आर. सी. बाफना गोशाळेला भेट
- ❑ दीपस्तंभ-मनोबल संस्थेला भेट
- ❑ " कृषी समकक्ष दर्जा" मुळे वीजबिलात होणार बचत
- ❑ नागपूर विभागात ' पशुधन उत्पादकता वाढ' कार्यशाळा
- ❑ जगातील सर्वात बुटकी म्हैस म्हणून 'राधाची' नोंद!
- ❑ जागतिक अंडी दिन राज्यभरात उत्साहात साजरा
- ❑ राजस्थान राज्य पशुपालन विभागाच्या '१९६२ कॉल सेंटर'ला भेट
- ❑ तज्ञ पशुवैद्यक योग्य उपचार, आजारी पशुधनाला मिळाले जीवदान!
- ❑ गाईच्या पोटातून काढली सोन्याची अंगठी
- ❑ संत बाळूमामाच्या मेंढ्याला शस्त्रक्रियेमुळे जीवदान
- ❑ कुक्कुटपालन व्यवसायात भरारी: अमोल पाटील यांची यशोगाथा
- ❑ दुग्धव्यवसायात क्रांती: हरेश चौधरी यांचा 'मुरघास' प्रकल्प
- ❑ माध्यमांनी घेतलेली दखल
- ❑ शीतलहरींपासून पशुधनाचा बचाव करण्यासाठी मार्गदर्शक तत्वे
- ❑ पशुसंवर्धनाचा व्यवसाय सुरु करताना घ्यावयाची काळजी
- ❑ उत्तम प्रजननासाठी गाई-म्हशींची योग्य काळजी
- ❑ ओळख पशुधनाची: लालकंधारी
- ❑ प्रतिजैविके: कार्य आणि महत्त्व
- ❑ पशुधनातील वंध्यत्व: कारणे व उपाय
- ❑ कृत्रिम रेतन - शास्त्रोक्त पद्धत व कायदे
- ❑ पशुसंवर्धन शब्दसंग्रह

आधुनिक पशुवैद्यकीय सेवेकडे एक पुढचे पाऊल

जळगाव: दि. ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी मा. डॉ. रामास्वामी एन, (सचिव, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग) तसेच पालक सचिव, जळगाव जिल्हा यांनी तालुका लघु पशुसर्वचिकित्सालय, धरणगाव येथे भेट दिली. या दौऱ्यात त्यांनी जिल्हा नियोजन समितीमार्फत प्राप्त निधी वापरून उभारण्यात आलेल्या नवीन इमारतीची रचना, सोयीसुविधा आणि कार्यप्रणाली आदींची पाहणी केली. पशुवैद्यकीय सेवांमधील तांत्रिक प्रणाली, उपचार पद्धती व दैनंदिन सेवा रेकॉर्ड यांची तसेच लघु पशुसर्वचिकित्सालयात उपलब्ध असलेल्या अत्याधुनिक निदान व उपचार उपकरणांची पाहणी करून त्यांच्या वापराबाबत माहिती घेतली. याप्रसंगी जिल्हाधिकारी श्री. रोहन घुगे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद श्रीमती मिनल करनवाल आणि जिल्हा उपआयुक्त, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय डॉ. प्रदीप झोड उपस्थित होते. ही भेट ग्रामीण भागातील पशुसंवर्धन सेवा अधिक सक्षम, वैज्ञानिक आणि शाश्वत बनविण्याच्या दिशेने एक प्रेरणादायी पाऊल ठरणार आहे.

जळगाव: दि. ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी मा. डॉ. रामास्वामी एन, (सचिव, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग) तसेच पालक सचिव, जळगाव जिल्हा यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय, जळगाव येथे जिल्हा आढावा बैठक आयोजित करण्यात आली. बैठकीत जिल्ह्याच्या सर्वांगीण विकाससंदर्भात कृषी, सिंचन, पर्यटन, उद्योग, पायाभूत सुविधा, आरोग्य, शिक्षण, महिला व बालविकास, तसेच जलसंपदा व आवास योजना आदी विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. या बैठकीस जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, आयुक्त महानगरपालिका, तसेच जिल्ह्यातील सर्व संबंधित विभागांचे प्रमुख उपस्थित होते.

आर. सी. बाफना गोशाळेला भेट

जळगाव: दि. ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी मा. डॉ. रामास्वामी एन, (सचिव, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग) तसेच पालक सचिव, जळगाव जिल्हा यांनी आर. सी. बाफना गोशाळा, अजिंठा रोड येथे भेट देऊन गोशाळेतील कार्यपद्धतीचा सविस्तर आढावा घेतला.

या भेटीदरम्यान गोशाळेतील पशुधनाची पाहणी, गाईंचे पोषण, आरोग्य आणि निवास व्यवस्थेबाबत माहिती घेऊन गोशाळेच्या देखभालीबाबत समाधान व्यक्त केले. गाईंच्या शेण, गोमुत्र आणि दुधापासून तयार होणाऱ्या गोमय पदार्थांचे उत्पादन व विक्री वाढवून गोशाळा आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या सूचना यावेळी मा. डॉ. रामास्वामी एन. यांनी दिल्या. गोशाळा व्यवस्थापनाने या उत्पादनांद्वारे ग्रामीण रोजगारनिर्मिती व महिला स्वयंसहाय्यता गटांच्या सहभागाला चालना द्यावी, असा संदेश दिला.

याप्रसंगी जिल्हाधिकारी श्री. रोहन घुगे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद श्रीमती मिनल करनवाल आणि जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय डॉ. प्रदीप झोड उपस्थित होते. ही भेट गोसंवर्धन, स्वावलंबन व शाश्वत उपजीविकेच्या दिशेने एक मार्गदर्शक उपक्रम ठरेल, अशी अपेक्षा गोशाळा संचालकांनी व्यक्त केली.

दीपस्तंभ-मनोबल संस्थेला भेट

जळगाव: दि. ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी मा. डॉ. रामास्वामी एन, (सचिव, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग) तसेच पालक सचिव, जळगाव जिल्हा यांनी दिव्यांग, अनाथ, तृतीयपंथीय तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा, तंत्रज्ञान आणि व्यक्तिमत्व विकासाचे प्रशिक्षण देणाऱ्या भारतातील पहिल्या निवासी संस्थेला, अर्थात दीपस्तंभ-मनोबल या संस्थेस भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी संस्थेच्या कार्यपद्धतीची पाहणी, प्रशिक्षण व कौशल्य विकास या उपक्रमांबद्दल माहिती घेतली. मा. सचिव महोदयांनी संस्थेतील विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधत प्रेरणादायी मार्गदर्शन केले आणि संधी मिळाल्यास कुणीही उंच भरारी घेऊ शकतो, असा संदेश दिला.

संस्थेचे सर्वसमावेशक शिक्षण व सामाजिक परिवर्तनाचा दृष्टीकोन, तसेच दिव्यांग व दुर्बल घटकांसाठी शिक्षण आणि आत्मनिर्भरतेच्या माध्यमातून समाजात समता आणि सन्मान निर्माण करण्याच्या कार्याचे कौतुक केले. याप्रसंगी जिल्हाधिकारी श्री. रोहन घुगे, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद श्रीमती मिनल करनवाल, उपविभागीय अधिकारी श्री. विनय गोसावी आणि जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय डॉ. प्रदीप झोड उपस्थित होते.

" कृषी समकक्ष दर्जा"मुळे वीजबिलात होणार बचत

डॉ. प्रवीणकुमार देवरे (भा.प्र.से.)
आयुक्त पशुसंवर्धन,
महाराष्ट्र राज्य, पुणे-६७

महाराष्ट्र आर्थिक सल्लागार परिषदेने सन २०२८ पर्यंत महाराष्ट्राची अर्थव्यवस्था १ ट्रिलियन डॉलरपर्यंत पोहोचविण्यासाठी सादर केलेल्या पथदर्शी आराखड्यानुसार सदर उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आर्थिक सल्लागार परिषदेने उत्पन्न वाढीस चालना देऊ शकतील, असे ८ घटक सुनिश्चित केले असून त्यामध्ये "कृषी व संलग्न" या घटकाचा समावेश आहे. तसेच, निती आयोगाने सन २०२१ च्या अहवालात पशुसंवर्धन व्यवसायापासून देशाच्या / राज्याच्या सकल उत्पादनात पशुसंवर्धनाच्या व्यवसायाचा सहभाग वाढविण्यासाठी उपाययोजना करण्याची शिफारस केली आहे.

पशुपालकांना भेडसावणाऱ्या कृषी वीज दराच्या तुलनेत जास्त वीज दर, सोलर एनर्जीसाठी अनुदानाचा अभाव, ग्रामपंचायत कर, शेती कर्जाच्या व्याज दराच्या तुलनेत अधिक व्याज दराची आकारणी या अडचणींचे निराकरण झाल्यास पशुपालन व्यवसायाकडे लोकांचा कल वाढून पशुजन्य उत्पादनात वाढ होईल. व्यावसायिक नफ्यात वाढ तसेच स्पर्धात्मक वातावरण यामुळे पशुजन्य उत्पादित बाबींस मुल्यवर्धन साखळीची निर्मिती, शेतीप्रमाणे गट पध्दतीने पशुसंवर्धन, अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब यासारख्या बाबीमध्ये आपोआप वाढ होईल. ही बाब विचारात घेऊन शासनाने पशुसंवर्धन व्यवसायास " कृषी समकक्ष दर्जा" देण्याचा निर्णय घेतला आहे. शासनाच्या या निर्णयाचे लाभ लघु व मध्यम स्वरुपाचा व्यवसाय करणाऱ्या पशुपालकांना खालीलप्रमाणे अनुज्ञेय राहतील:-

पशुसंवर्धन विषयक व्यवसायासाठी वीज दर आकारणी "कृषी इतर" या वर्गवारीनुसार न करता कृषी वर्गवारीप्रमाणे वीज आकारणी करण्यात येईल.

१. कुक्कुटपालन व इतर पशुसंवर्धन व्यवसायासाठी सोलर पंप व इतर सोलार संच उभारण्यास कृषी व्यवसायास देण्यात येणाऱ्या दराने अनुदान / सवलत देण्यात येईल.
२. पशुपालन व्यवसायास स्वतंत्र व्यवसाय न समजता शेती व्यवसाय समजून कृषी व्यवसायास ज्या दराने ग्रामपंचायत कर आकारणी केली जाते, त्याच दराने व राज्यभरात समान दराने ग्रामपंचायत कर आकारणी करण्यात येईल.
३. कृषीप्रमाणे पशुपालन व्यवसायास कर्जावरील व्याज दरात सवलत देण्यात येईल.

पशुपालन व्यवसायास "कृषी समकक्ष दर्जा" लागू करण्यात आल्याने वरील लाभांपैकी" वीजदरात सवलत लागू करण्यासाठी कार्यपध्दती विहित करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती. त्यानुसार पशुपालन व्यवसायास "कृषी समकक्ष दर्जा" लागू करण्यात आल्याने वीजदरात सवलतीचा लाभ खालील अटी पूर्ण करणाऱ्या पशुपालकांना देय राहील.

अ) पशुधन

१. २५,००० किंवा त्यापेक्षा कमी मांसल कुक्कुट पक्षी / ५०,००० किंवा त्यापेक्षा कमी अंडी उत्पादक कुक्कुट पक्षी
२. ४५,००० किंवा त्यापेक्षा कमी क्षमतेच्या हॅचरी युनिट
३. १०० किंवा त्यापेक्षा कमी दुधाळ जनावरांचा गोठा
४. ५०० किंवा त्यापेक्षा कमी मेंढी / शेळी गोठा
५. २०० किंवा त्यापेक्षा कमी वराह

ब) वीजदरात सवलतीचा लाभ मिळण्याकरिता पशुपालन प्रकल्पांनी संबंधित जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांच्याकडे नोंदणी करणे आवश्यक आहे.

क) पशुपालन प्रकल्पांमधील सर्व पशुधनाची एनडीएलएम (भारत पशुधन) पोर्टलवर नोंदणी आवश्यक आहे.

ड) पशुपालन प्रकल्पाकरिता स्वतंत्र वीज मीटर असणे आवश्यक आहे. पशुपालन प्रकल्पातील पशुगृह, चारा/पशुखाद्य, पाण्याचे पंप, प्रक्रिया व शितसाखळी राखण्याकरिता आवश्यक यंत्रसामुग्रीकरिता सवलतीच्या दरातील वीजवापर करता येईल.

इ) अवसायनातील सहकारी संस्था / बंद पडलेले पशुपालन प्रकल्प वीजदर सवलतीस पात्र ठरणार नाहीत.

वीजदर सवलत लागू करण्यासाठी पुढील प्रमाणे कार्यपध्दती अवलंबण्यात येईल:-

अ) "कृषि समकक्ष दर्जा" च्या अनुषंगाने सध्या कार्यरत असलेल्या / अस्तित्वात असलेल्या वीजदर सवलतीस पात्र लाभार्थ्यांचा आवश्यक तो तपशील संबंधित तालुका पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय अधिकारी यांनी संबंधित उपअभियंता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी-महावितरण (MSEDCL) यांना उपलब्ध करुन द्यावा.

ब) नवीन पशुपालक लाभार्थ्यांनी वीज मीटर जोडणीसाठी संबंधित, उपअभियंता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी-महावितरण (MSEDCL) यांच्याकडे ऑनलाईन / ऑफलाईन पध्दतीने विहित स्वरुपात अर्ज सादर करावा. सादर केलेल्या अर्जाची प्रत सहाय्यक आयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय), तालुका पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय अधिकारी कार्यालय यांना देण्यात यावी.

क) सदर योजनेच्या निकषाप्रमाणे तसेच, त्यामध्ये वेळोवेळी होणाऱ्या बदलास अनुसरुन आवश्यक त्या बाबींची पूर्तता करणे लाभार्थ्यांस बंधनकारक असेल.

ड) वीजदर सवलती संदर्भातील येणाऱ्या तांत्रिक अडचणी सोडविण्यासाठी सहाय्यक आयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) व अतिरिक्त कार्यकारी अभियंता / उप कार्यकारी अभियंता उप विभाग महावितरण हे तालुका स्तरावर तसेच संबंधित जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) कार्यालय व कार्यकारी अभियंता (प्रशासन) मंडल कार्यालय महावितरण हे जिल्हास्तरावर समन्वयाचे काम पाहतील.

इ) महावितरण कंपनीने पात्र लाभार्थ्यास वीजदरात सवलत देण्यासाठी आवश्यक ती पुढील कार्यवाही करावी व त्याचा स्वतंत्र तपशील ठेवावा. सर्व जिल्ह्यातील पात्र लाभार्थ्यांची माहिती व त्यासाठी लागणारा निधी याची माहिती एकत्रितपणे संकलित करून आयुक्त (पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय) कार्यालय पुणे यांच्याकडून मुख्य अभियंता (वाणिज्य) मुख्य कार्यालय, मुंबई यांना पाठविण्यात यावी. त्यानंतर मुख्य अभियंता (वाणिज्य) महावितरण कार्यालयाकडून अग्रीम निधीची मागणी ऊर्जा विभागास करण्यात येईल.

फ) सदर योजनेत वीज ग्राहकांचा अनाधिकृत वीजवापर आढळल्यास विद्युत अधिनियम, २००३ कलम १२६ व कलम १३५ च्या अनुषंगाने प्रचलित नियमानुसार कार्यवाही करण्याची जबाबदारी महावितरण (MSEDCL) कंपनीची राहील.

नागपूर विभागात ' पशुधन उत्पादकता वाढ' कार्यशाळा

प्रतीदिन प्रतीपशु एक लीटर अधिक दुधाचे उद्दिष्ट

नागपूर: विभागात नुकत्याच पार पडलेल्या 'उत्कृष्ट पशुधन उत्पादकता कार्यशाळे'ने येथील सर्व क्षेत्रीय पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांसाठी एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला. प्रजनन क्षमता, पोषण आणि व्यवस्थापन सुधारून प्रती पशु दररोज एक लिटर अधिक दूध उत्पादन वाढविण्याचे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट या कार्यशाळेत निश्चित करण्यात आले. या कार्यशाळेपूर्वी विभागात ९८० शिबिरे आयोजित करून १७,७५२ गायी आणि म्हशींवर वंध्यत्व निवारण मोहीम यशस्वीरित्या राबविण्यात आली होती.

या कार्यशाळेला डॉ. राजेश गुप्ता, एसजीएम (पशुपोषण, प्रजनन व पशु आरोग्य), एनडीडीबी; डॉ. भूपेंद्र भारद्वाज, निवृत्त अतिरिक्त संचालक, पशुसंवर्धन (राजस्थान सरकार); आणि डॉ. स्वप्नील देशमुख, एसएमओ, एबीएस यांसारख्या नामवंत मार्गदर्शकांनी मार्गदर्शन केले. त्यांनी प्रजनन व्यवस्थापन, उत्पादकता वाढ आणि संप्रेरकांचा (हार्मोन्सचा) योग्य वापर याबाबत तांत्रिक माहिती दिली. यामुळे पशुवैद्यकांना क्षेत्रातील गैरसमज दूर करण्यास, व्यावहारिक धोरणे शिकण्यास आणि तांत्रिक दृष्टिकोन बळकट करण्यास मदत मिळाली.

महिला पशुवैद्यकांचा गौरव: कार्यशाळेदरम्यान पशुप्रजनन आणि आरोग्य मापदंडांचे सहामाही मूल्यांकन करण्यात आले आणि उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्यांना सन्मानित करण्यात आले. विशेष म्हणजे, पहिले दोन स्थान महिला पशुवैद्यकांनी पटकावले, जे नागपूर विभागातील महिला पशुवैद्यकीय आणि उत्कृष्टतेसाठी अभिमानास्पद क्षण ठरले :

१. डॉ. ममता वानखेडे,
२. २. डॉ. ज्योती चव्हाण
३. ३. डॉ. लयिक खान.

निरंतर प्रशिक्षण आणि डेटा विश्लेषणावर भर: डॉ. सतीश राजू, प्रादेशिक सहआयुक्त (पशुसंवर्धन), नागपूर विभाग यांनी उत्पादकता वाढीच्या मापदंडांवर आधारित कार्यशाळा आणि तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली प्रत्यक्ष निरंतर क्षेत्रीय प्रशिक्षणाची आवश्यकता व्यक्त केली. त्यांनी पशुवैद्यकांना सुधारित प्रजनन व्यवस्थापन, पोषण आणि वैज्ञानिक हस्तक्षेपाद्वारे सध्याच्या कळपातील प्रत्येक पशुचे दूध उत्पादन किमान एक लिटरने वाढवण्याचे आवाहन केले. तसेच, वस्तुनिष्ठ निर्णय घेण्यासाठी डेटा संकलन, विश्लेषण आणि सादरीकरण यावर त्यांनी भर दिला.

समर्पित प्रयत्नांचे कौतुक

डॉ. शितल मुकणे, अतिरिक्त आयुक्त, पशुसंवर्धन विभाग आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ (MLDB) यांनी नागपूर विभागाच्या टीमचे समर्पित प्रयत्न आणि कामगिरीची प्रशंसा केली. शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी पशुवैद्यकांनी क्षेत्रात समर्पित भावनेने काम करण्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. या यशस्वी उपक्रमामुळे प्रोत्साहित होऊन, नागपूर विभाग आता पशुप्रजनन क्षमता वाढवण्यासाठी अधिक क्षेत्रीय कार्यशाळा आणि व्यावहारिक प्रशिक्षण सत्रे आयोजित करण्याची योजना आखत आहे, ज्यामुळे शास्त्रोक्त पशुधन विकास, उत्पादकता वाढ आणि शेतकऱ्यांची समृद्धी सुनिश्चित करण्याच्या त्यांच्या वचनबद्धतेची पुष्टी होते.

कार्यशाळेप्रसंगी दीपप्रज्वलन करताना डॉ. सतीश राजू, प्रादेशिक सहआयुक्त (पशुसंवर्धन) नागपूर विभाग, डॉ. राजेश गुप्ता, एसजीएम (पशुपोषण, प्रजनन व पशु आरोग्य), एनडीडीबी; डॉ. भूपेंद्र भारद्वाज, निवृत्त अतिरिक्त संचालक, पशुसंवर्धन (राजस्थान सरकार); आणि डॉ. स्वप्नील देशमुख, एसएमओ, एबीएस आदी.

'माण'च्या भूमीतून, जगाच्या विक्रमी पटावर

जगातील सर्वात बुटकी म्हैस म्हणून 'राधा'ची नोंद!



सातारा जिल्ह्याचा माण तालुका म्हणजे दुष्काळी प्रदेश म्हणून ओळखला जातो, पण याच मातीतून आलेल्या एका बुटक्या जीवाने आज संपूर्ण जगाचे लक्ष वेधून घेतले आहे. मलवडी येथील सामान्य शेतकरी त्रिंबक दाजी बोराटे यांच्या गोठ्यात जन्मलेल्या 'राधा' या म्हशीने आपल्या केवळ २ फूट ८ इंच (८३.८ सें.मी.) उंचीच्या देहाने जगात सर्वात मोठा विक्रम केला आहे. १९ जून २०२२ रोजी जन्मलेल्या 'राधा'ने, आपल्या अनोख्या उंचीमुळे, जगातील सर्वात बुटकी जिवंत पाळीव म्हैस (World's Shortest Living Domesticated Buffalo) म्हणून २८ ऑक्टोबर २०२५ रोजी प्रतिष्ठित गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्स मध्ये दिमाखाने नोंद मिळवली आहे. ही केवळ एका म्हशीच्या नोंदीची गोष्ट नाही, तर महाराष्ट्राच्या ग्रामीण पशुधनाची क्षमता आणि मालक कुटुंबाने घेतलेल्या अपार मेहनतीची यशोगाथा आहे, जी सोलापूर ते परभणीच्या कृषी प्रदर्शनांमध्ये आकर्षण ठरल्यानंतर आता जागतिक स्तरावर तळपायला सज्ज झाली आहे.

(अधिक माहिती पुढील पृष्ठावर...)

राधा ही केवळ म्हैस नसून, तिने महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील पशुपालनाचे महत्त्व आणि त्याची क्षमता जागतिक स्तरावर सिद्ध केली आहे. ती सातारा जिल्ह्याची आणि महाराष्ट्राची एक अभिमानास्पद ओळख बनली आहे. राधाचा जन्म मलवडी येथील शेतकरी व पशुपालक त्रिंबक दाजी बोराटे यांच्या घरीच झाला. राधा साधारण दोन ते अडीच वर्षांची झाल्यावर तिची उंची इतर म्हशींपेक्षा वाढत नाहीये हे मालक त्रिंबक बोराटे यांच्या लक्षात आले. त्यांचे कृषी पदवीधर असलेले पुत्र अनिकेत बोराटे यांनी राधाला कृषी प्रदर्शनांमध्ये सहभागी करण्याचा निर्णय घेतला. सुरुवातीला अनेकांनी प्रतिसाद दिला नाही. मात्र, २१ डिसेंबर २०२४ रोजी सोलापूर येथील सिद्धेश्वर कृषी प्रदर्शनात पहिल्यांदा सहभागी झाल्यावर 'राधा'चा सर्वत्र बोलबाला सुरू झाला. परभणी येथील कृषी प्रदर्शनानंतर अनिकेत यांनी गिनीज वर्ल्ड रेकॉर्डसाठी प्रयत्न सुरू केले. यासाठी त्यांना पशुधन विकास अधिकारी डॉ. शरद थोरात यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले. डॉ. थोरात यांनी १२ सप्टेंबर २०२५ रोजी राधाची पाहणी करून अहवाल पाठवला आणि २० सप्टेंबरला कागदपत्रे सादर केली.

डॉ. शरद थोरात
पशुधन विकास अधिकारी,
पशुवैद्यकीय चिकित्सालय, वावरहिरे,
ता. माण, जि. सातारा

विक्रमी यश आणि महत्त्वाचे टप्पे

राधाने आपल्या अनोख्या उंचीमुळे जागतिक स्तरावर महाराष्ट्राचे नाव उज्ज्वल केले आहे.

- **गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड:** १२ सप्टेंबर २०२५ **इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड:** २४ जानेवारी २०२५

  हे दोन्ही विक्रम नोंदवून राधाने सिद्ध केले आहे की, लहान आकारातही मोठी क्षमता असू शकते.

कृषी प्रदर्शनांमध्ये राधा हे नेहमीच प्रमुख आकर्षण ठरते. तिच्या या असामान्य उंचीमुळे तिला पाहण्यासाठी सामान्य शेतकऱ्यांसह अनेक मान्यवर आणि तज्ज्ञांची गर्दी होते. गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद झाल्यामुळे बोराटे कुटुंब आणि मलवडी गावासाठी हा खूप मोठा अभिमानाचा क्षण आहे. अनिकेत बोराटे यांची अपेक्षा आहे की, राधाला भविष्यात आंतरराष्ट्रीय प्रदर्शनांमध्ये देखील सहभागी करून घ्यावे.



GUINNESS WORLD RECORDS

CERTIFICATE

TRIMBAK DAJI BORATE

took part in a
GUINNESS WORLD RECORDS™ title
The shortest living water buffalo is 83.8 cm (2 ft 8 in), achieved by Radha (India), in Malawadi, Maharashtra, India, on 12 September 2025.

OFFICIALLY AMAZING



India Book of Records
Extraordinary feats.. Extraordinary people

IBR ACHIEVER

Trimbak Daji Borate (born on June 2,1968) of Satara, Maharashtra, is titled as 'IBR Achiever' for owning a 2 year and 10-month-old Murrah cross buffalo (measuring 3 feet in height x 3 feet 9 inches in length), as confirmed on January 24, 2025.

Issued on : February 10, 2025

जागतिक अंडी दिनानिमित्त राज्यभरात विविध कार्यक्रमांचे आयोजन

जागतिक अंडी दिनानिमित्त राज्यभरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करुन शालेय विद्यार्थ्यांसह दुर्गम आदीवासी भागात अंडी दिन उत्साहात साजरा करण्यात आला. "नैसर्गिक पोषणमुल्याने परिपूर्ण असलेले शक्तीशाली अंडे" अशी यंदाच्या जागतिक अंडी दिनाची थीम होती. या थीमनुसार मानवी आहारातील अंड्याची उपयोगिता व आवश्यकता याविषयी पशुसंवर्धन विभागामार्फत राज्यभरात क्षेत्रीय स्तरावर विविध कार्यक्रमांद्वारे अंड्यांचे वाटप करुन जनजागृती करण्यात आली. नागरिकांचा या सर्व कार्यक्रमांना भरभरून प्रतिसाद मिळाला.

मुंबई पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. स्मिता जिंतुरकर यांनी पशुधन विकास अधिकारी डॉ. दीपक रणदिवे व डॉ. राहुल वऱ्हाडपांडे यांच्यासमवेत आदिवासी पाडा, आरे कॉलनी, गोरेगाव, मुंबई येथे क्षेत्रीय स्तरावर एक कार्यक्रम आयोजित केला. या कार्यक्रमाचा उद्देश आदिवासी समुदायांमध्ये अंड्यांच्या पौष्टिक महत्त्वाबद्दल जागरूकता निर्माण करणे हा होता. अंडी हे परवडणारे आणि संपूर्ण प्रथिनांचे स्रोत आहेत, जे विशेषत: मुलांमध्ये चांगले आरोग्य राखण्यासाठी आवश्यक आहेत. या उपक्रमाचा एक भाग म्हणून, नियमित अंडी सेवनाला प्रोत्साहन देण्यासाठी आणि चांगले पोषण वाढवण्यासाठी आदिवासी मुलांना अंडी वाटण्यात आली. तसेच डॉ. जिंतुरकर यांनी अधोरेखित केले की, दैनंदिन आहारात अंडी समाविष्ट केल्याने कुपोषणाशी लढण्यास मदत व सामाजिक विकासाला प्राधान्य मिळते.

रत्नागिरी: पशुसंवर्धन विभाग, रत्नागिरी अंतर्गत सर्व संस्थांच्या माध्यमातून विविध शाळांमध्ये विद्यार्थ्यांना अंड्यांचे वाटप करण्यात आले. तसेच अंड्याचे मानवी आहारातील पौष्टिक मूल्य, प्रथिनांचे महत्त्व आणि आरोग्यदायी फायदे याबाबत मार्गदर्शन देण्यात आले. या कार्यक्रमाचा उद्देश मुलांमध्ये संतुलित आहाराबाबत जागृती निर्माण करणे आणि "दररोज एक अंडे : आरोग्यासाठी खरे सोने" हा संदेश रुजविणे होता. अंडे हे निसर्गाचे परिपूर्ण अन्न असून, त्यात लहान मुले, गरोदर माता, स्तनदा माता, कुपोषित बालके यांच्या शारीरिक विकासासाठी आवश्यक सर्व घटक असतात. त्यामुळे प्रत्येकाने आपल्या दैनंदिन आहारात अंड्याचा समावेश करून तंदुरुस्त आणि बलशाली भारताच्या निर्मितीत योगदान द्यावे, असा प्रेरणादायी संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

जिल्हा परिषद माध्यमिक शाळा इतवारा, नांदेड येथे जागतिक अंडी दिनानिमित्त सर्व विद्यार्थ्यांना अंडी शिजवून खाऊ घालण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. अंडी आहाराचे महत्व मुलांना समजल्याने त्यांनी दररोज आहारामध्ये अंड्यांचे सेवन करणार असल्याचे सांगितले. जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त राजकुमार पडीले यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

लातूर: पशुसंवर्धन विभाग, लातूर अंतर्गत सर्व संस्थांच्या माध्यमातून कार्यक्षेत्रातील शाळांमध्ये विद्यार्थ्यांना अंड्यांचे वाटप करण्यात आले. तसेच अंड्याचे मानवी आहारातील पौष्टिक मूल्य, प्रथिनांचे महत्त्व आणि आरोग्यदायी फायदे याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमाचा उद्देश मुलांमध्ये संतुलित आहाराबाबत जागृती निर्माण करणे हा होता. अंडे हे परिपूर्ण अन्न असून लहान मुले, गरोदर माता, स्तनदा माता, कुपोषित बालके यांच्या शारीरिक विकासासाठी आवश्यक सर्व घटक अंड्यामध्ये असतात. त्यामुळे प्रत्येकाने आपल्या दैनंदिन आहारात अंड्याचा समावेश करून तंदुरुस्त आणि बलशाली भारत राष्ट्राच्या निर्मितीत योगदान द्यावे, असा प्रेरणादायी संदेश या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना देण्यात आला. नागरिकांनाही याबाबत अवगत करण्यात आले.

तालुका लघुपशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय, बदलापूर या संस्थेच्या परिसरातील प्रगती अंध विद्यालयातील विद्यार्थ्यांना जागतिक अंडी दिनाचे महत्व समजावून सांगण्यात आले. तसेच उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना अंडी शिजवून खाऊ घालण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. अंडी आहाराचे महत्व मुलांना समजल्याने त्यांनी दररोज आहारामध्ये अंड्यांचे सेवन करणार असल्याचे सांगितले.

जळगाव

पवैद श्रेणी-१ पिंपळगाव हरे, ता. पाचोरा, अंतर्गत मूकबधिर निवासी विद्यालय, पिंपळगाव हरे येथे विद्यार्थ्यांना अंड्याचे महत्त्व समजावून सांगण्यात आले व अंडी वाटप करण्यात आली. याप्रसंगी संस्थाप्रमुख डॉ. अंकुश धोंड (पशुधन विकास अधिकारी, पिंपळगाव) व श्री. राजगोपाल बाविस्कर (पशुधन पर्यवेक्षक, पिंपळगाव) व श्री. प्रताप घुले (व्रणोपचारक) उपस्थित होते.

सांगली World Egg Day निमित्ताने 'द माईटी एग: नैसर्गिक पोषणाने परिपूर्ण' या थीमवर आधारीत विविध कार्यक्रमांचे आयोजन सांगली जिल्ह्यातील पशुवैद्यकीय संस्थांच्या कार्यक्षेत्रातील शाळांमध्ये करण्यात आले होते.

क्षेत्रीयस्तरावर संस्थाप्रमुखांनी शाळांमध्ये तसेच गावांमध्ये जाऊन नागरिकांसह विद्यार्थ्यांना अंडी आहाराची उपयोगिता व आवश्यकता याविषयी माहिती दिली. महिला वर्गाचाही या कार्यक्रमांना उत्तम प्रतिसाद लाभला. स्तनदा मातांसह शारिरीक कष्टाची कामे करणाऱ्या महिलांना 'अंडी आहार एक पूरक आहार' असल्याचे यावेळी पशुवैद्यकांनी समजावून सांगितले.

अंगणवाडी शाळा ऐतवडे ता. वाळवा जि. सांगली, येथे "अंड्याचे आहारातील महत्व "या विषयावर मार्गदर्शन करत व अंडी वाटप कार्यक्रम करण्यात आला.

तालुका पशुवैद्यकीय चिकित्सालय, वसमत अंतर्गत कार्यक्षेत्रातील निवासी वसतिगृहातील विद्यार्थ्यांना १८० अंडी वाटप करण्यात आली.

पशुसंवर्धन विभाग, लातूर अंतर्गत सर्व संस्थांच्या माध्यमातून “जागतिक अंडी दिन” उत्साहात साजरा करण्यात आला. या उपक्रमांतर्गत वाढवण बुद्रुख येथील शालेय विद्यार्थ्यांना अंड्यांचे वाटप करण्यात आले

तालुका लघु पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय, कमळेश्वर, जि. नागपूर अंतर्गत कार्यक्षेत्रातील शाळांमध्ये जागतिक अंडी दिनानिमित्त अंड्याचे वाटप करुन विद्यार्थ्यांना अंडी आहाराचे महत्व समजावून सांगण्यात आले.

अंगणवाडी बांबवडे, ता. शाहूवाडी, जि. कोल्हापुर येथे तालुका लघुपशुवैद्यकीय सर्वचिकित्सालयाच्या वतीने अंडी वाटपाचा कार्यक्रम घेण्यात आला, ज्यामध्ये लहान मुलांना अंड्याचे पौष्टिक मूल्य समजावून सांगण्यात आले.

पशुवैद्यकीय चिकित्सालय, श्रीष्ठी, ता. परतूर, जि. जालना अंतर्गत जागतिक अंडी दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त शालेय विद्यार्थ्यांना अंड्यांचे वाटप करुन आहारातील महत्व समजावून सांगण्यात आले. शिक्षकवृंदानेही या उपक्रमाचे स्वागत करत विद्यार्थी व पालकांना अंडी आहाराबाबत सातत्यपूर्ण माहिती देणार असल्याचे सांगितले.

पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभाग, धुळे द्वारा अंगणवाडी सोनगीर येथे अंडी वाटप

पवैद श्रेणी -१, महिरावणी ता. जि.नाशिक येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व अंगणवाडी, महिरावणी येथे विद्यार्थ्यांना अंडी वाटप करण्यात आली. डॉ . ए. आर. कुटे, पशुधन विकास अधिकारी यांनी अंड्यांचे आहारातील महत्त्व व पोषण तत्व तसेच आरोग्यदायी फायदे, याबद्दल माहिती दिली .

आश्रम शाळा, लालठाणे ता. पालघर येथे विद्यार्थ्यांना अंड्याचे पोषणमूल्य, प्रथिने, जीवनसत्त्वे, हाडे मजबूत करणे, मेंदूला चालना देणे आणि रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यास अंड्याचे योगदान यावर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच अंडी वाटप करण्यात आली.कार्यक्रमास डॉ. भुवनेश्वर बोरकर, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, आणि डॉ. राहुल संखे, पशुधन विकास अधिकारी यांनी मार्गदर्शन केले. सदर उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये पोषणाबद्दल जागरूकता वाढली.

जागतिक अंडी दिनानिमित्त अंगणवाडी शाळा क्रमांक ८० कवठे एकंद, जिल्हा सांगली येथे अंड्याचे आहारातील महत्त्व या विषयावर उपस्थित बालकांना मार्गदर्शन व अंगणवाडीत अंडी वाटप कार्यक्रम करण्यात आला.

जागतिक अंडी दिनानिमित्त अंगणवाडी नाळेश्वर (जि. नांदेड) येथे अंड्याचे आहारातील महत्त्व या विषयावर बालकांसह नागरिकांना मार्गदर्शन व अंडी वाटप कार्यक्रम करण्यात आला. यावेळी नागरिकांना सफल व असफल अंड्याविषयी माहिती देण्यात आली.

पवैद श्रेणी-२, नाथवडे, ता. वैभववाडी, जि. सिंधुदुर्ग अंतर्गत पशुधन पर्यवेक्षक श्री. किशोर काळे यांनी नाथवडे चारवाडी शाळा व अंगणवाडी केंद्र येथे विद्यार्थ्यांना उकडलेली अंडी वाटप केली व नागरिकांमध्ये अंडी आहाराच्या उपयोगितेबद्दल जनजागृती केली.

पवैद पौड ता. मुळशी अंतर्गत पौड अंगणवाडी क्र. २ येथे पशुधन विकास अधिकारी डॉ. प्रिया बागडे यांनी बालकांना उकडलेली अंडी वाटप केली व नागरिकांना अंडी आहाराचे महत्व समजावून सांगितले.

राजस्थान राज्य पशुपालन विभागाच्या '१९६२ कॉल सेंटर'ला भेट

मा. आयुक्त पशुसंवर्धन डॉ. प्रवीणकुमार देवरे (भा.प्र.से.) यांचे सुचनांनुसार जयपुर येथील राजस्थान पशुपालन विभागाच्या अधिनस्त "१९६२ कॉल सेंटर"ला महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी डॉ. भगतसिंग कदम (सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, रोगनियंत्रण) यांनी भेट दिली. या भेटीदरम्यान डॉ. कदम यांनी व्हाट्स ॲप चॅटबॉटसह संस्थेचे कार्य समजावून घेतले.

राजस्थानमधील शेतकऱ्यांमध्ये व्हिडिओ कॉलद्वारे पशुवैद्यकीय सल्लामसलत प्रक्रिया अधिक लोकप्रिय असल्याचे या भेटीदरम्यान डॉ. कदम यांचे निदर्शनास आले. योजनेची सुरुवात असतानाही दररोज २०० पशुपालकांचे कॉल येत असून, पशुवैद्यकीय अधिकारी पशुपालकांना मार्गदर्शन आणि प्राथमिक उपचाराच्या दृष्टीने आवश्यक औषधे देत आहेत. या कॉलसेंटरचे वैशिष्ट्य म्हणजे राजस्थान पशुपालन विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या सर्व राज्यस्तरीय तसेच केंद्रस्तरीय सरकारी योजनांची माहिती पशुपालकांना उपलब्ध करुन देण्यात येते.

राजस्थान पशुपालन विभागाच्या अधिनस्त संनियंत्रित करण्यात येणाऱ्या या कॉलसेंटरची स्वतंत्र इमारत असून, वातानुकूलित यंत्रणेने सुसज्ज असलेल्या या सेंटरमध्ये ३३ कॉल एक्झिक्युटिव्ह आणि ६ पशुवैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत. पशुवैद्यकीय सुविधा एका कॉलवर उपलब्ध होत असल्याने पशुपालकांकडून या उपक्रमांचे स्वागत होत असल्याची माहिती डॉ. हेमंत पंत, सहआयुक्त पशुसंवर्धन विभाग, राजस्थान आणि कॉल सेंटर व्यवस्थापक श्री. अमन यांनी दिली.

स्मार्ट प्रकल्पांतर्गत यवतमाळ येथे कार्यशाळा

यवतमाळ: मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प (स्मार्ट) योजनेअंतर्गत तसेच पशुसंवर्धन विभाग, यवतमाळ अधिनस्त सुर्यावान फार्मर प्रोड्युसिंग कंपनी (FPO), ता. पांढरकवडा, जि. यवतमाळ या संस्थेच्या अंतर्गत कार्यरत ४० लाभार्थी पशुपालकांची कार्यशाळा शुक्रवार, दि. २६/०९/२०२५ रोजी ग्राम उमरी (रोड), ता. केळापूर जि. यवतमाळ येथे आयोजित करण्यात आली होती. शेळी व कुक्कुटपालन हा व्यवसाय पशुपालकाला हमखास फायदा देणारा असल्याने या व्यवसायाकडे युवा वर्गाचा कल दिवसेंदिवस वाढू लागला आहे. बाजारपेठेतून शेळी व कुक्कुट मांसाला असलेली मोठी मागणी, तुलनेने कमी असलेला पुरवठा व त्यामुळे दरामध्ये होणारी सातत्याने वाढ लक्षात घेता या व्यवसायाला युवावर्गाची पसंती मिळत आहे. अनेक ग्रामीण सुशिक्षीत तरुण या व्यवसायात पदार्पण करत असल्याने ग्रामीण भागात रोजगार निर्मितीची प्रक्रिया वेगवान होत आहे. स्मार्ट योजनेतील या पशुपालक कार्यशाळेचा मुख्य हेतू हाच होता की, चांगल्या प्रकारे, कौशल्यपूर्ण पशुपालन करून ग्रामीण आर्थिक परिवर्तन घडवून आणणे तसेच शेळीपालन व परसातील कुक्कुटपालन या क्षेत्रात पशुसंवर्धन विषयक मूल्य साखळी विकसीत करण्यासाठी मार्गदर्शन करणे. या अनुषंगाने ग्रामीण युवा वर्गात या व्यवसायाबाबत जागरुगता वाढावी व त्यासंबंधी तांत्रिक मार्गदर्शन सहज उपलब्ध व्हावे, या हेतूने शेळी व परसातील कुक्कुटपालन व वैरण विकास या विषयावर तज्ञांची एक दिवसीय व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. डॉ. मंगेश काळे, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, यवतमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. सायली तगारे, (सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, तालुका लघु पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालय, पांढरकवडा जि. यवतमाळ) तसेच पशुधन विकास अधिकारी डॉ. रणजित नाळे (ता.ल.प.स.चि.), डॉ. अतुल ओंकार (पविअ, पंचायत समिती पांढरकवडा), डॉ. अनुप काळमेघ (पविअ, प.चि. धारणा) आणि डॉ. प्रशांत पायघन (पविअ, प.चि. पाटणबोरी) तसेच सर्व पशुधन पर्यवेक्षक व कर्मचारी वर्ग यांनी हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडला.

या प्रशिक्षणाचा व्यवसायासाठी चांगला उपयोग झाल्याचे लाभार्थी पशुपालकांच्या अभिप्रायांवरुन दिसून आले.

तज्ञ पशुवैद्यक योग्य उपचार, आजारी पशुधनाला मिळाले जीवदान!

गीर गोवंशाचे शास्त्रीय व अध्यात्मिक महत्व अलिकडच्या काळात लोकांमध्ये रुजू लागल्याने शेतकरी व पशुपालकांचा गीर गोवंश संवर्धनाकडे ओढा वाढू लागला आहे. पशुवैद्यकीय दवाखाना, तितूर, जि. यवतमाळ या केंद्राच्या कार्यक्षेत्रालगतच असलेल्या शेरेकर यांच्या फार्महाऊसमध्ये दोन शुद्ध गीर जातीच्या गोवंशाचे संवर्धन करण्यात येत आहे. एका खाजगी पॅराव्हेटच्या चुकीच्या उपचारपद्धतीमुळे हे पशुधन लम्पी चर्मरोगाच्या संकटात सापडले. मात्र, पशुवैद्यकीय दवाखाना, तितूरचे पशुधन विकास अधिकारी डॉ. हर्षल रेवतकर यांच्याद्वारे योग्य उपचार केले गेल्यामुळे सदरच्या पशुधनाला जीवदान मिळाले आहे.

शेरेकर यांच्या फार्महाऊसमधील एक वर्ष वयाच्या गीर कालवडीचे नाव गौरी, तर ११ महिने वयाच्या गीर गोऱ्ह्याचे नाव गोपाल आहे. काही दिवसांपुर्वी एका खाजगी पॅराव्हेटने यातील गोऱ्ह्याला लम्पीग्रस्त पशुधनाच्या उपचारासाठी वापरलेल्या सुईने आयव्हरमॅक्टीन नावाचे इंजेक्शन टोचले व त्यामुळे त्यास लम्पी रोगाची लागण झाली. खाजगी पॅराव्हेटच्या या बेजबाबदारपणात आणखी भर पडली ती दुसऱ्या एका खाजगी पॅराव्हेटची. त्याने पशुधनास सातत्याने पेनकिलर्स औषधी दिली. याद्वारे योग्य औषधोपचार न करता केवळ पशुधनाच्या वेदना दडपल्या गेल्या. सुरुवातीला बैलमालकांना हा आजार किती गंभीर आहे, याची कल्पना नव्हती. हळूहळू परिस्थिती बिघडत गेली.

पशुवैद्यकीय चिकित्सालय तितूर इथे रूजू झालेल्या डॉ. हर्षल निळकंठ रेवतकर, पशुवैद्यकीय अधिकारी, तितूर यांनी अशा गंभीर अवस्थेत समुपदेशन करुन नंतर केस हाताळली. रक्त तपासणीनंतर असे लक्षात आले की, शरीरातील प्लेटलेट्स आणि पांढऱ्या रक्तपेशी कमी झाल्या होत्या. यामुळे बैल जमिनीवर बसला तरी थोड काही रुतल्या गेल की रक्तस्राव सुरू व्हायचा. बैलामध्ये Thrombocytopenia निर्माण झाली. अगदी माणसांमध्ये डेंग्यू झाल्यावर जशी अवस्था होते तशीच. पांढऱ्या पेशी कमी झाल्यामुळे ही अवस्था झाली होती. शेरेकर कुटुंबही या परिस्थितीमुळे पुरते हतबल झाले होते. एवढे देखणे व महागडे पशुधन हातातून निसटणार की काय, अशी भीती त्यांच्या मनात निर्माण झाली. डॉ. रेवतकर यांनी शेरेकर यांना सांगितले की, ही पारंपरिक केस नाही. हा आजार माणसाच्या डेंग्यूसारखा आहे. म्हणून वेगळ्या पद्धतीने उपचार करावा लागेल.हा निर्णय खूप धाडसी होता, पण परिस्थिती त्याहून गंभीर होती.

डॉ.हर्षल रेवतकर यांनी जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्नव दुग्धव्यवसाय डॉ. नितीन फुके व जिल्हा पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालय नागपूरचे सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन डॉ. नंदगवळी यांच्या मार्गदर्शनाखाली उपचारांची मोहीम सुरू केली. रक्तस्राव होऊ नये म्हणून विशेष काळजी, प्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी योग्य औषधोपचार, संतुलित आहार आणि पूरक द्रव्यांचा पुरवठा व सर्वात महत्वाचं म्हणजे दररोज बारकाईने तपासणी करण्याचे डॉ. रेवतकर यांनी कटाक्षाने पाळले. १५ दिवस सातत्यपूर्वक करण्यात आलेल्या ट्रीटमेंटमध्ये शेरेकर कुटुंबानेही अपार संयम दाखवत बैलाला लेकरासारखं जपलं. हळूहळू बैलाच्या शरीरात प्लेटलेट्स वाढू लागल्या, पांढऱ्या रक्तपेशींची संख्या सुधारू लागली आणि अखेरीस तो बैल पूर्णपणे तंदुरुस्त झाला. शेरेकर कुटुंबियाने डॉ. रेवतकर व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांचे आभार मानत येथून पुढे तज्ञ पशुवैद्यकाकडूनच पशुधनावर उपचार करवून घेण्याचा निर्णय घेतला आहे.

गाईच्या पोटातून काढली सोन्याची अंगठी

पथ्रोट, (अमरावती) : पूजेच्या ताटात ठेवलेली पाच ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी नैवेद्यासोबत नजरचुकीने गाईला खाऊ घालण्यात आल्याची घटना भाऊबीजेच्या दिवशी मुऱ्हादेवी येथे घडली. ही चूक लक्षात आल्यावर घरातील अख्खे कुटुंब चिंतेत होते. परंतु, पथ्रोट येथील पशुधन विकास अधिकारी डॉ. रोशन वेरुळकर यांनी मेटल डिटेक्टरद्वारे शोध घेऊन गाईवर यशस्वी शस्त्रक्रिया केल्यानंतर ती सोन्याची अंगठी बाहेर काढून कुटुंबाच्या हवाली करण्यात आल्याची अफलातून घटना पथ्रोट, (अमरावती) येथे घडली.

मुऱ्हादेवी येथील रहिवासी असलेले पोलिस पाटील तुळशीराम पखान यांच्या मुलीने भाऊबीजेच्या दिवशी ओवाळणीकरिता पूजेच्या साहित्यासोबत ताटात सोन्याची पाच ग्राम वजन असलेली अंगठी ठेवली होती. कार्यक्रमानंतर पूजेच्या ताटात ठेवलेले इतर साहित्य व नैवेद्य गाईला भरवितांना नेमके त्याच वेळी नजरचुकीने साहित्या सोबत ताटात ठेवलेली अंगठी सुद्धा गाईने गिळली. पखान यांनी स्थानिक डॉक्टरांकडून त्या गाईवर उपचार केले व शेणावाटे अंगठी बाहेर येण्याची वाट पाहिली. सतत चार दिवस हा नित्यक्रम सुरू राहिला. परंतु, त्यामध्ये यश आले नाही. मग स्थानिक डॉक्टरांनी पथ्रोट येथील पशुधन विकास अधिकारी डॉ. रोशन वेरुळकर यांच्याकडून पुढील उपचार घेण्याचा सल्ला दिला.

सदर घटनेची माहिती मिळाल्यानंतर डॉ. वेरुळकर यांनी आपले सहकारी डॉ. आदेश चोपडे (पविअ, धनेगांव) यांना सोबत घेऊन मुऱ्हा येथे जाऊन सदर गाईची मेटल डिटेक्टरद्वारे तपासणी करून पोटात धातू असल्याची खात्री करून घेतली. ही धातूमय वस्तू शस्त्रक्रियेद्वारे बाहेर काढण्यात येते असे पशुपालकास सांगितले. त्यानंतर दीड तासाच्या शस्त्रक्रियेनंतर गायीच्या पोटातून सोन्याची अंगठी तसेच पाच नाणे व बशीचा तुकडासुद्धा यशस्वीरीत्या बाहेर काढून अंगठी पशुपालकाच्या स्वाधीन केली. शस्त्रक्रियेनंतर गाईने लगेच पूर्ववत खाणे-पिणे सुरू केले असून, गाय आता स्वस्थ आहे.

संत बाळूमामाच्या मेंढ्याला शस्त्रक्रियेमुळे जीवदान

पशुधन विकास अधिकारी रोशन वेरूळकर, आदेश चोपडे यांची कामगिरी

पथ्रोट, (अमरावती): जनुना गावात -संत बाळूमामा यांचे मंदिर आहे. त्याठिकाणी एका आजारी असलेल्या मेंढ्यावर येथील पशुधन विकास अधिकारी रोशन वेरूळकर व आदेश चोपडे यांनी यशस्वी शस्त्रक्रिया करून त्याला जीवदान दिले आहे.

संत बाळूमामा मंदिर जनुना येथील देवस्थानमध्ये कार्यरत असणारे भक्त सागर मोरे यांनी त्याठिकाणी असलेला नर मेंढा हा प्राणी आजारी असल्याबाबत पशुधन विकास अधिकारी डॉ. रोशन वेरूळकर यांना फोनद्वारे कळविले होते. त्यावेळी सदर मेंढ्याची तपासणी केली असता व खाण्याच्या सवयी लक्षात घेता मेंढ्याने प्लॅस्टिक खाल्ल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले होते. म्हणून त्याच्यावर त्वरित पोटाची शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेण्यात आला. शस्त्रक्रियेमध्ये मेंढ्याच्या पोटातून प्लॅस्टिक पिशव्या, दोऱ्या, कापड, वायर आदी जवळपास सहा किलोचे साहित्य मिळाले. पोटावरच्या यशस्वी शस्त्रक्रियेनंतर दुसऱ्या दिवशीपासून मेंढ्याने नियमितपणे खाणेपिणे सुरू केले आहे. सध्या त्याची प्रकृती चांगली आहे. सदर शस्त्रक्रियेमध्ये पशुधन विकास अधिकारी डॉ. रोशन वेरूळकर व डॉ. आदेश चोपडे यांचा सहभाग होता.

कुक्कुटपालन व्यवसायात भरारी: अमोल पाटील यांची यशोगाथा

पशुसंवर्धन विभागाच्या योजना आणि प्रशिक्षणाचा योग्य लाभ घेऊन आपले भविष्य कसे उज्ज्वल करता येते, याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे सोलापुर जिल्ह्यातील माढा तालुक्यातील मोडनिंब येथील श्री. अमोल सुनील पाटील यांची यशोगाथा. केवळ शेतीत राबून न थांबता, त्यांनी कुक्कुटपालन व्यवसायात उतरण्याचा धाडसी निर्णय घेतला आणि आज ते या क्षेत्रात एक यशस्वी उद्योजक म्हणून ओळखले जात आहेत.

अमोल पाटील यांच्या यशाची सुरुवात झाली ती सघन कुक्कुट विकास गट, नेहरू नगर, सोलापूर येथे घेतलेल्या १५ दिवसीय कुक्कुटपालन व्यवसाय प्रशिक्षणाने. पशुधन विकास अधिकारी डॉ. स्नेहंका बोधनकर यांच्या मार्गदर्शनाखाली मिळालेल्या या तांत्रिक ज्ञानामुळे, त्यांना या व्यवसायाची ताकद आणि शक्यता यांची कल्पना आली. प्रशिक्षण पूर्ण होताच, अमोल पाटील यांनी कोणताही विलंब न लावता पुणे येथून १५०० बी.व्ही. ३०० लेयर (Layer) पक्षी खरेदी केले आणि प्रत्यक्ष व्यवसायाला सुरुवात केली. आज त्यांच्या या प्रयत्नांचे फळ त्यांना दररोज १२०० ते १२५० अंड्यांच्या उत्पादनाच्या रूपात मिळत आहे.

विशेष म्हणजे, श्री. पाटील यांनी केवळ अंडी उत्पादक म्हणून न राहता, व्यवसायवृद्धीचे महत्त्वाचे पाऊल उचलले. त्यांनी आपला व्यवसाय होलसेल अंडी विक्रीपर्यंत विस्तारला आहे आणि आज ते दररोज १०,००० ते १२,००० अंडी स्थानिक बाजारपेठेमध्ये विकत आहेत. एका छोट्या प्रशिक्षणाने सुरू झालेला हा प्रवास, आज एका मोठ्या आणि यशस्वी व्यावसायिक उपक्रमात बदलला आहे.

श्री. अमोल पाटील यांचा हा प्रवास ग्रामीण भागातील प्रत्येक तरुणाला प्रेरणा देणारा आहे. आपल्या आत्मविश्वासाच्या आणि योग्य नियोजनाच्या जोरावर अमोल पाटील भविष्यात उत्पादन क्षमता आणखी मोठ्या प्रमाणावर वाढवण्यास सज्ज आहेत.

दुग्धव्यवसायात क्रांती: हरेश चौधरी यांचा 'मुरघास' प्रकल्प

भारत हा कृषिप्रधान देश असून, येथे शेतीला पूरक असलेल्या दुग्धव्यवसायाला मोठे महत्त्व आहे. मात्र, जनावरांच्या वाढत्या खुराकाचा आणि वैरणीचा खर्च हा पारंपरिक गोठा चालवणाऱ्यांसाठी नेहमीच एक मोठे आव्हान ठरला आहे. याच आव्हानावर मात करत, नंदुरबार जिल्ह्यातील भादवड (ता. नवापूर) येथील श्री. हरेश पुनमचंद चौधरी यांनी आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने आपल्या दुग्धव्यवसायात मोठी क्रांती घडवून आणली आहे.

परंपरेने मोठा गोठा चालवणारे श्री. चौधरी यांच्याकडे सध्या सुमारे ९० जनावरे असून, त्यांचे ६५ टक्के उत्पन्न वैरणीच्या खर्चात जात होते. हा खर्च कमी करून दुग्धोत्पादन वाढवण्यासाठी त्यांनी केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी राष्ट्रीय पशुधन अभियान या योजनेचा आधार घेतला. या अभियानांतर्गत, त्यांनी अत्याधुनिक मुरघास (Silage) निर्मिती प्रकल्पाची उभारणी केली. वार्षिक ३००० मे. टन क्षमतेचे मुरघास बेल तयार करणारे स्वयंचलित यंत्र विकत घेऊन त्यांनी मक्यापासून उच्च प्रतीचा मुरघास तयार करण्यास सुरुवात केली. त्यांच्या या दूरदृष्टीमुळे केवळ त्यांच्या गोठ्याचा उत्पादन खर्च १०-१५ टक्क्यांनी कमी झाला नाही, तर दुग्धोत्पादनही लक्षणीय वाढले. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, श्री. चौधरी यांचा हा प्रकल्प आजूबाजूच्या परिसरासाठी आर्थिक विकासाचे केंद्र बनला आहे. मका उत्पादक शेतकऱ्यांसाठी त्यांच्या शेतातील मालाला हक्काची बाजारपेठ मिळाली आणि या प्रकल्पातून तब्बल ७३० मानवी दिवसांचा रोजगार निर्माण झाला.

श्री. हरेश चौधरी यांचा हा प्रकल्प केवळ एक व्यावसायिक यशकथा नाही, तर तो पारंपरिक शेतीत आधुनिक तंत्रज्ञान आणि सरकारी योजनांचा प्रभावी वापर कसा करावा, याचा एक उत्तम आदर्श आहे.

माजी राष्ट्रपती, 'मिसाईल मॅन' आणि महान वैज्ञानिक डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस मा. सहसंचालक (सांख्यिकी) श्रीमती सुषमा जाधव यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करत जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी उपआयुक्त पशुसंवर्धन सदस्य सचिव महाराष्ट्र गोजातीय प्रजनन विनियमन प्राधिकरण डॉ. प्रशांत भड, उपआयुक्त पशुसंवर्धन जिल्हा प्राणी क्लेष प्रतिबंधक सोसायटी डॉ. शिवाजी पवार आदींसह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

भारतीय संस्कृतीत गोमातेला असलेले महत्व व मानवाच्या प्रगतीत गोमातेचे असलेले योगदान लक्षात गोसेवा आयोगामार्फत राज्यभरात वसुबारस सप्ताह राबविण्यात आला. या सप्ताहानिमित्त पशुसंवर्धन आयुक्तालयात गोमय मुल्यवर्धित उत्पादन विक्रीचे दालन उघडण्यात आले होते. कार्यक्रमास मा. आयुक्त पशुसंवर्धन डॉ. प्रवीणकुमार देवरे (भा.प्र.से.) यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी सहआयुक्त पशुसंवर्धन तथा सदस्य सचिव गोसेवा आयोग डॉ. श्यामकांत पाटील यांचेसह आयुक्तालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी गोमय मुल्यवर्धित उत्पादन खरेदीचा लाभ यावेळी घेतला.

अंडी उत्पादनासाठी कुक्कुटपालनाला बळ

मागणी-पुरवठ्यातील तफावत दूर करणार

अनुराग कांबळे
anurag.kamble
@timesofindia.com

“ अंड्यांची तूट भरून काढून त्यात राज्याला अग्रेसर करण्यासाठी पशुसंवर्धन विभाग प्रयत्नशील आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पशुसंवर्धनमंत्री पंकजा मुंडे यांच्या मार्गदर्शनानुसार विभागाकडून त्यासाठी नियोजन करण्यात येत आहे. यात प्रत्येक जिल्ह्यात लाभार्थ्यांची निवड करणे, महिला बचत गटांना सहभागी करून घेणे यांसारखी पावले उचलण्यात येणार आहेत.
- डॉ. प्रवीणकुमार देवरे, आयुक्त, पशुसंवर्ध

मुंबई : राज्यात दररोज भासणारी अंड्यांची तूट भरून काढण्यासाठी सरकार आता आक्रमकपणे योजना राबविणार आहे. प्रत्येक जिल्ह्यात किमान एक हजार लाभार्थ्यांना व्हाइट लेगहॉन जातीच्या कोंबड्या, पिंजरा असे २१ हजार रुपये किंमतीचे युनिट देण्याची योजना लवकरच पशुसंवर्धन विभागातर्फे राबविण्यात येणार आहे; तसेच राज्यातील महिला बचत गटांनाही यात सहभागी करून घेत अंड्यांचे उत्पादन वाढविण्याचे नियोजन विभागाकडून करण्यात येत आहे.

राज्यात सध्या ३६,५०० पोल्ट्री फार्मस असून त्या माध्यमातून अंडी आणि मांसल कोंबड्यांची संगोपन आणि उत्पादन करण्यात येते. राज्यात दररोज २.५ कोटी अंड्यांची मागणी असते. परंतु, त्या तुलनेत केवळ एक ते दीड कोटी अंड्यांचेच उत्पादन होते. त्यामुळे एक कोटी अंड्यांची कमतरता भासते. ही तूट भरून काढण्यासाठी कर्नाटक, तेलंगण, तमिळनाडू या राज्यातून अंडी आयात करावी लागतात. यामुळे साहजिकच अंड्यांचा दर वधारतो.

हे चित्र बदलावे आणि अंड्यांचे उत्पादन वाढविण्यासाठी पशुसंवर्धन विभागाकडून रणनीती आखण्यात येत आहे. इतर राज्यांवरील अवलंबित्व दूर करून देशात अंडी उत्पादनात अग्रेसर व्हावे यासाठी विविध मार्ग अंमलात आणले जाणार आहेत. यात जिल्हानिहाय किमान एक हजार लाभार्थ्यांना ५० व्हाइट लेग... प्रजातीचे उच्च उत्पाद... असलेले कुक्कुट पक्षी... शास्त्रोक्त पद्धतीने तय... पिंजरा, असे एकूण २१... किंमतीचे युनिट उपलब्ध... जाणार आहे. यासाठी इतर... उपलब्ध निधीचा, ... संलग्नीकरण करून अ... उत्पादनवाढीसाठी प्रयत्न करण... येणार आहे. यासह राज्यातील महि... बचत गटाच्या जाळ्याचा वापर कर... घेण्यात येणार आहे. या माध्यमा... कुक्कुटपा... येप...

माध्यमांनी घेतलेली दखल

सकाळ

जनावरांच्या वंधत्व निवारण शिबिरात तपासणी, उपचार

धानोरा, ता. ७ : तालुक्यातील चातगाव येथील पशुवैद्यकीय दवाखान्याच्या वतीने जनावरांच्या वंधत्व निवारण शिबिराचे आयोजन करण्यात आले.

सद्य :स्थितीत २० टक्के जनावरे वंधत्वग्रस्त व माजावर न येणारी आहेत. परिणामी दूध उत्पादन कमी असून भाकड जनावरांची संख्या जास्त आहे. या समस्येवर मात करण्यासाठी तसेच पशुधनाच्या अनुवंशिक सुधारणा व उत्पादन क्षमतेत वाढ करण्यासाठी पशुवैद्यकीय दवाखाना चातगावअंतर्गत दोन गावांमध्ये वंधत्व निवारण पंधरवडा अभियान राबविण्यात आले. या शिबिरामध्ये १५ गायींमध्ये वंधत्व निवारण करून उपचार करण्यात आले. तसेच १२ जनावरांचे खच्चीकरण, २० जनावरांची गर्भधारणा तपासणी व ५० जनावरांचे जंत निर्मूलन करण्यात आले. पशुधन विकास अधिकारी डॉ. स्वप्नील उंदीरवाडे शिबिरांचे आयोजन केले, तर पशुधन पर्यवेक्षक अनिल नेटिनकर व हेमंत कोडाप यांनी सहकार्य केले.

धानोरा : जनावरांची तपासणी करताना डॉ उंदीरवाडे.

महाराष्ट्र टाइम्स नागपूर । शुक्रवार, १० ऑक्टोबर २०२५

अंडी शाकाहारीच, निश्चिंत मनाने खा!

▶▶डॉ. नितीन ह. फुके, नागपूर

अंडी सेवनाबद्दल जागरूकता निर्माण करण्यासह कुपोषणासारख्या समस्येवर मात करता यावी, या उद्देशाने दरवर्षी ऑक्टोबर महिन्यातील दुसरा शुक्रवार 'जागतिक अंडी दिन' म्हणून साजरा करण्यात येतो. आज शुक्रवार, १० ऑक्टोबर रोजी साजऱ्या होत असलेल्या या दिनानिमित्त...

अंडी खाणे हे मांसाहारी समजले जाते. परंतु, बाजारात मिळणारी अंडी शाकाहारीच आहेत व याचे उत्तर विज्ञानात आहे. कोंबडी वयात आल्यानंतर अंडी द्यायला सुरुवात करते ही क्रिया नैसर्गिक आहे. या क्रियेकरिता नर कोंबड्यांची आवश्यकता नसते. मादी कोंबडी व नर कोंबडा एकत्र असल्यानंतर यांच्या संयोगातून कोंबडी जी अंडी देतात, त्यातून जीव निर्मिती होण्याची शक्यता असते. अशी अंडी योग्य वातावरणात उबवणी केल्यास २० ते २१ दिवसांनंतर पिल्लू जन्माला येते व या अंड्यांचा वापर पक्ष्यांच्या निर्मितीकरिता केला जातो. अशा अंड्यांना आपण मांसाहारी अंडी म्हणू शकतो. परंतु, बाजारात विक्रीसाठी आणलेल्या अंड्यांपासून पक्षी जन्माला येत नाहीत. त्यामुळे बाजारात उपलब्ध असलेली अंडी संकोच न बाळगता खाण्यास हरकत नाही. या अंड्यांत जीव नसतो; परंतु, गैरसमजुतीमुळे त्यापासून मिळणाऱ्या अतिशय उच्च पोषणमूल्यांना आपण मुकतो. त्यामुळे बाजारातील अंड्यांना शाकाहारी समजून आरोग्याला पोषक घटक देणाऱ्या अंड्यांचे सेवन करून आरोग्य सुदृढ राखण्यासाठी प्रत्येकाने प्रयत्न करावयास हवा.

निमित्त

अंड्याला कवच असल्याने भेसळमुक्त अन्न घटक म्हणून त्याकडे बघितले जाऊ शकते. यात भरपूर प्रमाणात खनिजे व 'ब', 'क', 'ड', 'इ' जीवनसत्त्व असतात. अंड्यांमध्ये प्रथिनांचा मोठा स्रोत असून जवळपास सहा ग्रॅम प्रथिने (प्रोटीन) व ओमेगा-३ फॅटी-ॲसीड विपुल प्रमाणात आढळतात. नऊ प्रकारचे ॲमिनोॲसीड अंड्यांत असल्यामुळे अंडी ही परिपूर्ण आरोग्यदायी समजली जातात. आहारातील अंड्यांच्या समावेशामुळे मानवी रक्तातील घातक कोलेस्टेरॉल (एलडीएल)चे प्रमाण कमी होऊन आवश्यक कोलेस्टेरॉल (एचडीएल)चे प्रमाण वाढते. मेंदू आणि चेतासंस्थेच्या आरोग्यासाठी पूरक पोषण घटक अंड्यांमध्ये आहे. दैनंदिन आहारात शिफारस केलेल्या एकूण कोलीनपैकी २० टक्के कोलीन अंड्यांत असते. मेंदू पेशी निरोगी राहण्यासाठी आवश्यक फॉस्फोलिपीड्स हे कोलिनमुळे मिळते. डोळ्यांच्या आरोग्यासाठी कॅरिटोनाइड घटक आहारात समावेश असणे आवश्यक असते.

ल्युटीन आणि झेक्सेंथिन ही कॅरेटिनॉइड्स, फ्री रेडीकलपासून होणारी डोळ्याची हानी थांबवू शकतात. ट्रिप्टोफॅन आणि ट्रायरोसीन हे निद्रा हितकारक घटक अंड्यात असतात. ट्रिप्टोफॅन हे सेरोटॉनिन आणि मॅलोटोनिन यामध्ये रूपांतरित होऊन त्याचा मानवाच्या मनात कल आणि झोप यावर परिणाम घडवून आणते. अंड्यात असलेल्या ल्युटीन आणि झेक्सॉथिन या घटकामुळे वयोमानामुळे होणारी झीज रोखते. शरीराची झीज भरून घेण्याकरीता आवश्यक असलेले जीवनसत्त्व बी-१२ हे अंड्यांमध्ये हे मुबलक प्रमाणात आढळते. एका अंड्यामध्ये ५० मिलीग्रॅम कॅल्शीअम असते. त्यामुळे अंड्याच्या सेवनाने काही प्रमाणात कॅल्शीअमची पूर्तता भरून निघते. या व्यतिरिक्त अंड्यात मानवी शरीराकरिता लागणारे अत्यंत आवश्यक पोषणमूल्य तत्त्वे असल्याने अंड्यांचे सेवन अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. तसेच कुपोषणासारख्या आजारावर मात करण्याच्या दृष्टीने, रोगप्रतिकारक शक्ती वाढण्याकरिता व अनेक प्रकारच्या आजारांवर तसेच सुदृढ शरीरासाठी उपयुक्त असलेल्या अंड्यांच्या सेवनाने माणूस निरोगी राहू शकतो.

ताजी अंडी व शिळी अंडी पाण्यात सहज ओळखू येतात. पातेल्यातील पाण्यात आडवे झाले तर अंडे ताजे आहे. उभे राहिले तर कमी ताजे आहे व तरंगू लागले तर शिळे आहे असे समजावे. अशी अंडी खाऊ नयेत. अंडी रुंद भाग जमिनीकडे करून फारशा कोरड्या नसलेल्या ठिकाणी ठेवावीत. फ्रिजमधील अंडी खाद्यपदार्थ तयार करण्यापूर्वी त्यावर गरम पाणी ओतावे. अंडी उकडूनच खावीत. ॲल्युमिनीअमच्या भांड्यात अंडी उकडल्यास ती काळी पडतात. ढवळण्यासाठी लाकडी चमचा वापरावा, अन्यथा अंडी काळसर हिरवी होतात. अंडी मंदाग्नीवर शिजवा, अन्यथा कडक होऊन स्वाद नष्ट होतो. अशी अंड्यांचे शाकाहारी समजून सेवन केल्यास आपण निरोगी राहण्यास निश्चितच मदत होऊ शकते.

(लेखक नागपूर जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन व दुग्ध विकास विभागाचे उपायुक्त आहेत.)

डॉ प्रशांत चव्हाण यांची उत्कृष्ट कामगिरी

पुसद- तालुक्यातील आडगाव गावात एक आश्चर्यजनक घटना घडली असून, येथे एका शेळीने आठ पाय असलेल्या पिल्लाला जन्म दिला आहे. साधारणपणे शेळीला चार पाय असतात, परंतु या नवजात पिल्लाला आठ पाय असल्याने ग्रामस्थांमध्ये आश्चर्याचे व कौतुकाचे वातावरण निर्माण झाले आहे. ही दुर्मिळ घटना समजताच पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. प्रशांत चव्हाण यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी कुशलतेने वैद्यकीय उपचार करून या विशेष पिल्लाला आणि आई बकरीला जीवनदान दिले. उपचारादरम्यान डॉ. चव्हाण सरांनी मोठ्या काळजीपूर्वक शस्त्रक्रियेचा वापर करून पिलूयाच्या अंगातील अतिरिक्त अवयवांचा तपास केला व आवश्यक ते वैद्यकीय उपचार केले. डॉ. चव्हाण यांनी सांगितले की, 'अशा प्रकारच्या घटना अत्यंत दुर्मिळ असतात. हे प्रकरण कॉनजॉइन्ड ट्विन्स म्हणजेच जुळ्या भ्रूणांच्या अपूर्ण विभाजनामुळे झाले असावे. सध्या बकरी व पिल्लू दोघांचीही प्रकृती स्थिर असून उपचार सुरू आहेत.' गावक ? यांनी डॉ. प्रशांत चव्हाण यांच्या तत्पर प्रतिसादाचे व तज्ज्ञतेचे मनापासून कौतुक केले आहे. पशुपालकांनी सांगितले की, 'डॉ. साहेब वेळेवर आले नसते तर बकरीचे प्राण वाचले नसते. त्यांच्या अनुभवामुळे ही बकरी आज जिवंत आहेत.' या घटनेची चर्चा सध्या संपूर्ण परिसरात सुरू असून अनेक लोक पिआठ पायांच्या शेळीच्या पिलूयाचे फोटो मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत.

शीतलहरींपासून पशुधनाचा बचाव करण्यासाठी मार्गदर्शक तत्वे

डॉ. शैलेश केंडे
सहआयुक्त पशुसंवर्धन (मुख्यालय),
पशुसंवर्धन आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे -६७

डॉ. भगतसिंग कदम
सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन
(रोगनियंत्रण), पसं-१२,
पशुसंवर्धन आयुक्तालय, पुणे-६७

जेव्हा एखाद्या भुभाग / स्थान / भौगोलिक क्षेत्राचे किमान तापमान ४ अंश सेल्सिअस पेक्षा कमी होते, त्या वातावरणास शीत लहर म्हटले जाते. हवेच्या प्रवाहांमुळे एखाद्या स्थानावर शीत हवेचा मोठ्या प्रमाणात संचय होऊन शीतलहरी तयार होत असतात. शीतलहरींचे तापमान, कालावधी, आर्द्रतेचे प्रमाण व गारठवणाऱ्या वाऱ्याचा वेग यावर शीतलहरींमुळे होणारे नुकसान अवलंबून असते. हिवाळा ऋतुमध्ये अशा प्रकारच्या शीतलहरी निर्माण होण्याची शक्यता अधिक असते.

प्रतिबंध / बचाव आणि शीत वातावरणाशी अनुरूपता:

शीत लहरींच्या प्रकोपास तोंड देण्यासाठी प्रशासनाद्वारे बहुविभागीय व बहुआयामी प्रयत्न करणे आवश्यक आहे. शेतकरी व पशुपालक यांच्या पशुधनाचे आर्थिकदृष्ट्या नुकसान होऊ नये यासाठी शीतलहरींपासून बचाव व त्यांचा संभाव्य घातक परिणाम कमी करण्यासाठी वेळेपुर्वी हवामानाचा अंदाज वर्तविणे आवश्यक आहे. हवामानाचा अंदाज वर्तविल्यामुळे शेतकरी व पशुपालक यांना पशु-पक्षी यांचे शीतलहरींपासून संरक्षण करण्याच्या तयारीस मदत होते. तसेच अशावेळी तयारीतील सातत्य ही महत्वाचे ठरते.

शीतलहरींपासून बचावासाठी करावयाच्या तयारीमध्ये पशुधनासाठी निवारा उभारणे, पोषक चारा / वैरण व पशुखाद्य यांची उपलब्धता ठेवणे, तसेच सदर कालावधीत पशुमेळावे, पशुप्रदर्शने इत्यादी बाबी नियोजीत असतील, तर खबरदारी म्हणून पुढे ढकलणे आवश्यक आहे.

शीतलहरींमुळे होणारे बहुतांश आजार टाळता येण्यासारखे असतात. शीत लहरींमुळे होणाऱ्या संभाव्य धोक्यांपासून बचावाच्या उपाय योजना, परीणामकारक बचावाच्या उपाययोजनांचे ज्ञान असणे, प्रथमोपचार आणि पशुवैद्यकीय मदत इत्यादी बाबींच्या अंमलबजावणीमुळे पशुधनात होणारे बहुतांश आजार टाळता येणे शक्य आहे.

उष्ण / उबदार वातावरणातून शीतलहरीच्या क्षेत्रात स्थलांतरीत होणाऱ्या पशुधनास थंड वातावरणात थेट उघड्यावर सोडू नये, तसेच पिण्यासाठी पुरेसे कोमट पाणी पुरविण्यात यावे. पशुधनास शीत वातावरणाशी जुळवून घेता यावे यासाठी त्यांना टप्प्या-टप्प्याने शीत वातावरणात सोडावे.

उच्चतम जोखीम असलेले पशुधन वर्ग-

शीतलहरींमुळे पशुधन व वन्य प्राण्यात इजा किंवा मृत्यु ओढवतो. थंड / बर्फाळ वातावरणात पशुधनाची उर्जेची गरज वाढते. त्यासाठी उत्तम दर्जाच्या कर्बोदकांचा स्रोत असलेला चारा / वैरण पुरकखाद्य यांची उपयोगिता व उपभोग वाढतो. शीतलहर तीव्र असल्यास पशुधनास त्यांच्या निवाऱ्यातच आवश्यक चारा व पाणी पुरविण्यात यावे. अशावेळी बाहेर चरावयास सोडल्यास सकस चाऱ्याच्या अभावामुळे उपासमार व गारठल्याने पशुधनात मृत्यु ओढविण्याची शक्यता असते. शीतलहरीमध्ये उच्चतम जोखीम असलेले पशुधन वर्ग खालीलप्रमाणे असून, त्यांच्या व्यवस्थापनाची विशेष काळजी घेणे आवश्यक आहे.

१. नवजात वासरे, कालवडी / रेडके / कोकरे व करडे.
२. आजारी पशुधन / श्वसनसंस्थेचे विकार असलेले पशुधन.
३. धोकादायक पशुधन/ कमकुवत पशुधन.

शीतलहरमुळे होणारे आजार ओळखणे आणि प्रथमोपचार

शीतलहरीमुळे होणाऱ्या आजारांमध्ये खालील आजारांचा समावेश होतो-

१. हायपोथर्मिया
२. दंव चावणे
३. भूक मंदावणे
४. मोठ्या पशूधनात सांधे दुखी
५. कुत्र्यांच्या पिलात खोकला
६. श्वसनाचे विकार

शीतलहरीमुळे होणारे आजार, लक्षणे व प्रथमोपचार

शीतलहर आजार	लक्षणे	प्रथमोपचार
हायपोथर्मिया	शरीराचे तापमान कमी होणे, कंप, सुस्ती, निरुत्साह व शॉक	पशुधनाचा बाहेर चरण्याचा कालावधी कमी करावा, पशुधनास ऊन पडल्यास चरावयास सोडावे, तसेच पशुधनास ऊबदार पांघरून घालावे.
फ्रॉस्ट बाईट	निस्तेज, राट त्वचा त्वचेवर पुरळ येणे, त्वचा काळसर पडणे, गँगरीन होण्याची शक्यता.	पशुधनाचा बाहेर चरण्याचा कालावधी कमी करावा, तसेच पशुधनास ऊबदार पांघरूण घालावे. बाधीत भागास कोमट पाण्याने शेक द्यावा
कुत्र्यांच्या पिलांचा खोकला	श्वसन संस्थेसंबंधी रोग लक्षणे.	प्रतिबंधात्मक लसीकरण व तातडीने पशुवैद्यकीय मदत
शॉक	हृदयाचे ठोके अनियमित असणे, शरीराचे तापमान कमी होणे, हिरड्यांचा रंग निस्तेज व फिका पडणे.	शरीरातील उर्जेचे उत्सर्जन होणार नाही, याची काळजी घेत उबदार पांघरूण घालावे. तातडीने पशुवैद्यकीय मदत उपलब्ध करुन घ्यावी.

उपरोक्त कोणत्याही प्रकारचे लक्षणे पशुधनात दिसून आल्यास तातडीने पशुवैद्यकीय मदत पुरविणे गरजेचे आहे.

जनजागृती व पशुवैद्यकीय मदत -

शीतलहरींमध्ये पशुधनाची उर्जेची गरज वाढल्याने जगण्यासाठी मुबलक पोषक चारा / खाद्य आवश्यक असते. तसेच तापमानात टोकाचे बदल होत असल्यामुळे पशुधनाच्या प्रजोत्पादन क्षमतेवर परिणाम होऊ शकतो. पशुपालक व शेतकरी यांना शीतलहरीचा अंदाज, धोके, प्रथमोपचार इत्यादीबाबत जागृत करणे आवश्यक आहे. यासाठी शीतलहरींच्या प्रकोपापासून बचावाकरीता करावयाच्या प्रतिबंधक उपाययोजना तसेच शीतलहरींच्या कालावधीत काय करावे व काय करू नये, या बाबतीत माहिती, सूचना व व्यापक प्रसिध्दी देणे आवश्यक आहे. पायाभुत पशुवैद्यकीय सुविधांची उपलब्धता व अनुषंगिक सुधारणांमध्ये खालील बाबींचा समावेश असावा-

१. शीतलहरप्रवण क्षेत्रात पशुवैद्यक व पॅराव्हेटस पुरेशा संख्येने उपलब्ध असावेत.

२. या कालावधीसाठी पशुवैद्यकीय दवाखान्यात जीवरक्षक औषधी, शीरेतून द्यावयचे द्रव / क्षार द्रव, क्षार मिश्रणे व इतर औषधी साहित्य - सामुग्री यांचा पुरेसा साठा असावा.

३. फिरते पशुवैद्यकीय दवाखाने सुसज्ज असावेत.

४. पशुपालक व शेतकरी यांना शीतलहरीत पशुधनाचे व्यवस्थापन कसे करावे, याकरिता जागरुक करण्यासाठी आवश्यक प्रसिध्दी व प्रचार कार्यक्रम घ्यावेत.

५. मृत पशुधनांच्या शवांची विल्हेवाट लावण्याच्या जागा निश्चित करून घ्याव्यात.

६. इतर संबधित विभाग / संस्था यांच्या सातत्याने संपर्कात राहणे आवश्यक

शीतलहरी प्रकोपात पशुपालकांनी काय करावे / करू नये

शीत लहरींच्या प्रकोपाची तीव्रतेपासून संरक्षण करणे, अनुषंगिक आजार व मरतूक नियंत्रित करण्यासाठी खालील उपाययोजना उपयुक्त आहेत.

हे करावे

१. स्थानिक हवामान अंदाजाची अद्यावत माहिती ठेवावी.

२.वातावरणातील तीव्र बदलांपासून पशुधनाच्या बचावासाठी प्रतिबंधक उपाययोजनांची पुर्वतयारी करावी.

३. पशुधनाचा थंड वाऱ्यापासून बचाव करण्यासाठी निवारा चोहोबाजूने आच्छादित करावा, पत्र्याचे छत असल्यास त्यावर वाळलेले गवत अथवा कडब्याचा थर पसरावा तसेच पशुधनास निवाऱ्यातील जमिनीतील थंडीपासून बचावासाठी वाळलेल्या चाऱ्याचा थर / बिछाना अंथरावा.

४. पशुधनाचा निवारा हिवाळा ऋतुत जास्त सुर्यप्रकाश पुरविणारा व उन्हाळयात सुर्यकिरणांच्या तीव्रतेपासून बचाव करणारा असावा.

५. कडाक्याची थंडी असल्यास निवाऱ्यात कृत्रिम प्रकाश व उष्णता पुरवण्याची सोय करावी.

६. अशक्त व आजारी पशुधनास थंडीपासून बचावाकरीता झाकण्यासाठी पोती / बारदान यासारखी सोय असावी. तसेच रात्री सर्व पशुधन उबदार निवाऱ्यात ठेवावे.

७. पशुधनास ओलाव्यापासून दूर ठेवावे. तसेच उष्णतेसाठी शेकोटी पेटविली असेल, तर त्यापासून निघणाऱ्या धूरापासून त्यांचा बचाव करावा. ओलसरपणा / ओलावा व धूर यामुळे पशुधनास न्युमोनिया होण्याची शक्यता असते.

८. पशुधनाच्या शरीराचे तापमान नियंत्रित राहावे, यासाठी विशेषकरून लहान वयाचे व अशक्त पशुधनास पेंड आणि गुळ देण्यात यावे. तसेच त्यांना उबदार निवाऱ्याची सोय असावी.

९. उच्च दर्जाचा चारा व पशुखाद्याचा मुबलक साठा असावा.

१०. सुधारीत पशुपोषण पध्दती व पुरक खाद्य वापरावेत.

११. पशुधनास जंत / कृमीनाशके देण्यात यावे.

१२. पशुधनाचा बाह्यपरजीवीं किटकांपासून बचाव करण्यासाठी त्यांच्या निवाऱ्यात स्वच्छता ठेवावी तसेच निरगुडी, तुळस, लेमन ग्रास यांच्या जुड्या गोठ्यात लटकवाव्या, त्या वासाने बाह्य परजीवीं किटक पशुधनाच्या निवाऱ्यात येण्याची शक्यता कमी होते. निवाऱ्याच्या / गोठा स्वच्छतेसाठी कडूनींबाचा तेल असलेले निर्जंतुकीकरण द्रावण वापराता येईल.

१३. पशुधनाच्या संवर्गानुसार लाळ खुरकुत, घटसर्प, फऱ्या, पीपीआर, आंत्रविषार, इत्यादी रोग प्रतिबंधक लस देण्यात यावी.

१४. पशुखाद्यातून व पाण्यातून पुरेसे क्षार पुरविण्यात यावेत. दुभत्या पशुधनास संतुलित आहार व पुरक स्निग्ध खाद्य पुरविण्यात यावेत.

१५. पशुधनाच्या पाणी पिण्याची भांडी स्वच्छ असावीत, तसेच पशुधनास दिवसातून ४ वेळेस कोमट पाणी पिण्यास द्यावे.

१६. सहा महिन्यांपुढील गर्भार पशुधनास वाढीव खाद्य द्यावे.

१७. मृत पशुधनाच्या विल्हेवाटीची जागा ही सार्वजनिक जागा व पाणवठ्यापासून दूर असावी. तसेच ती जागा काटेरी कुंपनाने संरक्षित असावी आणि तेथे फलक लावण्यात यावा.

हे करू नये

१. शीतलहरीच्या काळात पशुधनास उघड्यावर बांधू नये, तसेच मोकाट सोडू नये.

२. शीतलहरीमध्ये पशु मेळाव्यांचे आयोजन टाळावे.

३. पशुधनास पिण्यास थंड पाणी देऊ नये.

४. पशुधनाच्या निवाऱ्यात ओलसरपणा व धूर टाळावा.

५. रात्री व थंडीत पशुधनास उघड्यावर बांधून ठेऊ नये.

६. मृत पशुधन कुरणावर अथवा चरावयाच्या मार्गात टाकू नये.

उपरोक्त सर्व उपाय योजनांसोबतच शेळी-मेंढी-कुक्कुटपक्षांमध्ये शीतलहर कालावधीत खालीलप्रमाणे काळजी घेण्यात यावी.

शीतलहरीच्या कालावधीत शेळ्या-मेंढ्यांची घ्यावयची काळजी:

१.स्थलांतर करणाऱ्या व रानात शेळी-मेंढी बसवणाऱ्या पशुपालकांनी विशेष खबरदारी घ्यावी. शक्यतो पशुधनास बंदीस्त उबदार निवारा मिळेल, याची दक्षता घेण्यात यावी.

२.शेळ्या-मेंढ्यांना उबदार आच्छादने पांघरावीत.

३. शरीरात लवकर उर्जा निर्माण होण्यासाठी कर्बोदकयुक्त खाद्य प्राधान्याने देण्यात यावे. परंतु, सिडॉसिस होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

४. शीतलहरीच्या काळात मेंढ्यांची लोकर कापणी थांबवावी.

५. वेळापत्रकानुसार लसीकरण करून घ्यावे.

६. आवश्यक औषधी व जिवनसत्वे यांचा साठा ठेवावा.

शीतलहरीत कुक्कुट पक्ष्यांची घ्यायची काळजी:

१. शेडमध्ये दोन्ही बाजूंच्या जाळ्यांना पडदे लावून रात्री व पहाटे थंड हवेच्या वेळी बंद करावे. उन्हाच्या वेळी / दुपारी पडदे उघडावेत.

२. पक्षीगृहात तपमान नियंत्रणाची सोय असावी.

३. पक्षीघरातील तपमान (२१ ते २३ डि. से.) नियंत्रित राहण्यासाठी शेडमध्ये बल्ब, शेगडी / ब्रुडरचा वापर करावा.

४. हवामानातील बदलामुळे पक्षांवर ताण येवू नये म्हणून आहारात इलेक्ट्रोलाइटस, जिवनसत्वे, इ. चा वापर करावा.

५. अति थंडीमुळे हवेतील आर्द्रता वाढून पक्षांची गादी, खाद्य यामध्ये बुरशीची वाढ होते व पक्ष्यांना श्वसनाचे रोग होण्याची दाट शक्यता असते. त्यामुळे पक्षी घरातील गादी स्वच्छ व कोरडी राहील, याची खबरदारी घेण्यात यावी.

६. पक्षांना पिण्यासाठी कोमट पाणी पुरवावे.

७. उर्जेची गरज वाढल्यामुळे आवश्यकतेनुसार पोषण तज्ञांच्या सल्ल्याने खाद्य तयार करून घ्यावे.

८. वेळापत्रकानुसार लसीकरण करून घ्यावे.

९. पुरेशी औषधे, क्षारमिश्रणे व जीवनसत्वांचा साठा ठेवावा.

पशुसंवर्धनाचा व्यवसाय सुरु करताना घ्यावयाची काळजी



डॉ. देवेंद्र जाधव
सहआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय
(पशुधन व नियोजन) पशुसंवर्धन आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे-६७

सद्यस्थितीत दुग्धव्यवसाय (गायपालन/ म्हैसपालन), शेळीपालन (अर्धबंदिस्त किंवा पूर्ण बंदिस्त) किंवा कुक्कुटपालन (मांस किंवा अंडी उत्पादनासाठी; बंदिस्त किंवा मुक्त पद्धत) हे व्यवसाय निव्वळ एक जोडधंदा न राहता बदलत्या हवामानामुळे शेतीच्या तुलनेत शाश्वत उत्पन्न देणारे मुख्य व्यवसाय होऊ पाहत आहेत. दररोज वाढणारी लोकसंख्या व सगळीकडे दूध व दुधाचे पदार्थ, मांस व अंडी यांची वाढती मागणी लक्षात घेता हे व्यवसाय दिवसेंदिवस वाढत जातील, अशी खात्री आहे. करिता, विविध योजना व सेवांद्वारे पशुसंवर्धन व्यवसायांच्या वृद्धीसाठी पशुसंवर्धन विभाग निरंतर कार्यरत आहे. पशुपालकांनी या योजना व सेवांचा लाभ घेतानाच पशुसंवर्धनाचा व्यवसाय करताना काय काळजी घेतली पाहिजे, याबाबत काही मार्गदर्शक बाबींचा अवलंब करणे अनिवार्य ठरते.

बऱ्याच वेळेस शहरात काही वर्ष राहिल्यामुळे स्वतःच्या गावाकडील जमिनीवर पशुसंवर्धनाच्या व्यवसायांपैकी एक व्यवसाय सुरु करण्याचा खूप लोकांचा मानस असतो. शिवाय आजकाल सरकारच्या काही नवीन योजनांमुळे मोठया हुद्यावर असलेले सरकारी कर्मचारी किंवा लोकप्रतिनिधी त्यांच्या कार्यकाळात एखादे गाव दत्तक घेऊन त्या गावाचा कायापालट करण्यासाठी विकास कामे हाती घेताना दिसत आहेत. पुष्कळ वेळा गावातील शेती व पशुधन, हे अशा विकास कामांचा प्रमुख भाग बनतात. शहरी जीवनातील अपेक्षांमुळे म्हणा किंवा गाव पातळीवर ह्या व्यवसायांच्या कार्यकारी पद्धतीचा अनुभव नसल्यामुळे बऱ्याच वेळेस असे व्यवसाय लवकरच बंद पडतात किंवा कालांतराने नुकसानीत जातात. त्यामुळे पशुपालन करून नवीन व्यवसायात पदार्पण करू इच्छिणाऱ्या किंवा विकास कामांचा भाग म्हणून पशुसंवर्धनासंबंधी कामे करणाऱ्या विकासकांनी याबाबत माहिती घेणे आवश्यक आहे.

पशुपालनाचा व्यवसाय सुरु करताना सर्वप्रथम ज्या भागात आपण व्यवसाय सुरु करणार आहोत तेथील भौगोलिक परिस्थितीचा व बाजारपेठांचा विचार प्रामुख्याने केला गेला पाहिजे. समुद्राजवळ किंवा दिवस-रात्रीच्या वातावरणात खूप तफावत असणाऱ्या ठिकाणी किंवा अतिउष्ण व दमट हवामानात दुग्धव्यवसाय; ते ही संकरीत गाई घेऊन सुरु केला तर नक्कीच फायद्याचे नाही. डोंगरउतार, माळरान किंवा कमी पाण्याच्या प्रदेशातही अशा संकरीत गाईंचा गोठा कालांतराने तोट्यात जाऊ शकतो. अशाठिकाणी होणारी चाऱ्याची उपलब्धताही लक्षात घेतली पाहिजे. कमी पाणी असलेल्या ठिकाणी, जिरायती जमिनीत किंवा माळरानावर चारा उत्पादन करणे अवघड आहे. शिवाय प्रत्येकवेळी लागणारा संपूर्ण चारा काही आपण विकत घेऊ शकणार नाही. अशावेळी कमी पाण्यातही अपेक्षित उत्पादन देणाऱ्या चारा प्रजातींची माहिती आपणास असणे आवश्यक असते. काही प्रमाणात चाऱ्याची तयारी आपल्या गोठ्याच्या आजूबाजूलाच आपणास करावी लागते. आपला व्यवसाय सुरु करण्याच्या आधी चारा उपलब्धता व कोणत्या वेळी कोणता चारा बाहेरून आणावा लागेल, याचे व्यवस्थित नियोजन करावे. नवीन चाऱ्याच्या जाती, त्यांची बियाणे मिळण्याचे ठिकाण यांचीही माहिती योग्यवेळी करून घ्यावी.

हल्ली एखाद्या ठिकाणी एकदम ५०, १०० किंवा त्याच्या अधिक पटीत गाई किंवा म्हशींचा गोठा बांधण्याची काही लोकांची इच्छा असते. अशावेळी प्राथमिक अवस्थेत जरी पैसे असल्यामुळे जाणवले नाही तरी मोठ्या आकाराच्या गोठ्यांमुळे चारा, पाणी, जमीन, एकदम येणाऱ्या व्यवस्थापनाचा ताण व रोज भरपूर प्रमाणात निर्माण होणाऱ्या शेणमुत्राची योग्य विल्हेवाट ह्या सर्व गोष्टी थोड्या दिवसानंतर तापदायक ठरू शकतात. शिवाय एवढ्या मोठ्या प्रमाणात चारा आणि पाणी मिळवणे म्हणजे जास्त व्यवस्थापन करण्यासारखे होते. ह्यात अजून एक महत्वाचा मुद्दा म्हणजे ५० किंवा १०० जनावरे बाहेरून आणून त्यांना आपल्या वातावरणानुसार चारा, पाणी आणि आजारांची जाणीव होऊन ते स्थीर उत्पादन देईपर्यंत आपले बरेच नुकसान होऊ शकते. त्यापेक्षा ५ ते १० चांगली जातीवंत जनावरे खरेदी करून त्यांच्यापासून आपल्याच गोठ्यात पुढची पिढी व्यवसायासाठी तयार करणे योग्य वाटते. म्हणूनच जर काही सुरुवात करायची असेल तर ५ किंवा १० जनावरांपासून सुरुवात करावी, त्यातून अनुभव घेऊन व्यवसाय वाढवणे शहाणपणाचे ठरेल. हेच प्रमाण व नियम शेळीपालनाच्या बाबतीतही लागू होऊ शकते. एकदम १०० ते २०० शेळ्यांचा फार्म सुरु करण्यापेक्षा आपल्याकडे उपलब्ध चारा, पाणी व व्यवस्थापनाची उपलब्धता यांचा विचार करूनच पुढे पाउल उचलावे. तसेच स्थानिक स्तरावरील बाजारपेठेचा आवाका, पशुजन्य उत्पादनांच्या मागणीचे प्रमाण व मिळणारा दर याबाबतही पशुपालकाने व्यवस्थित अभ्यास करणे आवश्यक ठरते.



पशुधन घेऊन सुरु करण्यात येणाऱ्या उद्योगांमध्ये सध्या गाजत असणारा मुद्दा म्हणजे उत्पादन करताना करण्यात येणाऱ्या रासायनिक औषधांचा वापर. सरकारने जरी ह्याबाबतीत कायदे केले असले तरी ग्राहक, मूळ उत्पादनकर्ता व प्रत्यक्ष फार्मवर काम करणारे लोक यांना त्याची जाणीव झाल्याशिवाय रसायनांचा खाद्य साखळीमधील वापर कमी होईल, याची शंका वाटते. व्यवस्थापनातील त्रुटींवर मात करून, प्रतिबंधात्मक उपाय करून व योग्यवेळी योग्य वनौषधींचा वापर करून (रासायनिक औषधांचा वापर न करता) नुकसान कमी करता येते. यासाठी प्रशिक्षणे व प्रत्यक्ष फार्मवर प्रात्याक्षिके घेऊन जागृती करता येऊ शकते. अशा ठिकाणी काही पारंपारिक उपचार व वनस्पती औषधांचे प्रशिक्षण लाभदायक ठरू शकेल. बऱ्याच वेळा प्रत्यक्ष फार्मवर काम करणाऱ्या व्यक्तींना अशा प्रशिक्षणाची व प्राथमिक उपचारांची माहिती मिळणे गरजेचे आहे. बऱ्याचवेळी शहरी भागात तयार आयुर्वेदिक उत्पादने मिळतात. त्याचा वापरही जनावरांच्या आरोग्यासाठी करता येतो. सध्या अग्रो टुरिझम म्हणजेच कृषी पर्यटनाला भरपूर चालना मिळाली आहे. याकडे व्यवसाय म्हणून पाहिल्यास देशी जनावरांचा गोठा किंवा मुक्त पद्धीतीत देशी कोंबडीपालन केल्यास दूध किंवा मांस व अंडी तर मिळतीलच, पण कृषी पर्यटन करायला येणाऱ्या लोकांना पारंपरिक पद्धती समजून येतील. शेवटी ग्राहक जोडणे हेच प्रत्येक व्यवसायाचे उद्दिष्टे असते. आपल्या आजूबाजूला सध्या बरेच असे आदर्श म्हणता येतील, असे गोठे व इतर जनावरांचे फार्म आहेत. जिथे भेटी देऊन ह्या व्यवसायाची व्याप्ती कळू शकेल. वृत्तपत्रांमधूनही अश्या व्यवसायांचे नेहेमीच उदाहरण दिले जाते.

पशुपालनाचा व्यवसाय सुरु करताना अजून एक महत्वाचा मुद्दा म्हणजे, एखाद्या ठिकाणी अत्यल्प दूध देणारी पण शेतीसाठी चांगले काम करणारी व शेणखत देणारी लहान चणीची गावरान जनावरे असतात. अशा जनावरांचा उत्पादन खर्चही फार येत नाही. अशावेळी त्या भागातील परिस्थितीनुसार जर अशी जनावरे पाळून शेणखताचा व्यवसाय सुरु केला तर अधिक फायद्याचा ठरेल. सेंद्रिय शेतीच्या वापरामध्ये शेंणखताला असलेले महत्व पाहता त्यातही चांगला परतावा मिळू शकतो. अशा व्यवसायासाठी दृष्टीकोन बदल करणे व फक्त दुधासाठीच जनावरे पाळली जातात, ह्या समजुतीला थोडा छेद देणे गरजेचे ठरते. थोडक्यात म्हणजे आपल्या जवळील पैसे गुंतवण्यासाठी पशुधन व्यवसाय योग्य असला तरी एकदम मोठ्या प्रमाणावर सुरुवात करण्यापेक्षा आपली जागा, चारा, पाणी उपलब्धता, पशुवैद्यकीय सुविधा व बाजार उपलब्धता आणि सर्वात महत्वाचा म्हणजे हवामान / वातावरण यांचा व्यावसायिक दृष्टीकोनातून अभ्यास होणे गरजेचे आहे. भविष्यातील व्यवसाय करण्यासाठी भाविष्यातीलच वातावरण आणि लोकमानस कसे असेल, ह्याचा विचार व्यवसाय सुरु करताना केला तर आपण काळाबरोबर योग्य मार्गक्रमण करू असे वाटते.

उत्तम प्रजननासाठी गाई-म्हशींची योग्य काळजी

जागतिक पातळीवरील एकूण दूध उत्पादनात २५ टक्के अर्थात २३९ दशलक्ष मेट्रिक टन योगदान देणारा भारत हा पहिल्या क्रमांकावरील देश आहे. दुग्धव्यवसायाचे राष्ट्रीय अर्थव्यवस्थेत ५ टक्के योगदान असून, २ कोटी ६५ लाख पशुपालक हा व्यवसाय करतात. ८ कोटींहून अधिक लोकांना थेट रोजगार देणारा हा सर्वात मोठा कृषी निगडीत व्यवसाय आहे. सद्यस्थितीत दुधाचे उत्पादन ५.८५ टक्के या वार्षिक चक्रवाढ दराने वाढत आहे. त्यामुळे दुग्धव्यवसाय शेतीशी निगडीत जोडधंदा न राहता मुख्य व्यवसाय होत आहे.

डॉ. गणेश निटूरे
पशुधन विकास अधिकारी,
तालुका लघुपशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय, रेणापूर

महाराष्ट्र राज्याच्या आर्थिक पाहणी (२४-२५) अहवालानुसार देशपातळीवर राज्याचा दूध उत्पादनात पाचवा क्रमांक (१६०४५ मेट्रिक टन) लागतो. गाई आणि म्हशींचे प्रजनन हे यशस्वी दुग्धव्यवसायाचे मूळ आहे. उत्तम प्रजननामुळे दूध उत्पादन वाढते, निरोगी वासरे जन्माला येतात व त्यामुळे पशुपालकांचे उत्पन्न वाढते. प्रजनन यशस्वी होण्यासाठी जनावरांची निवड, पोषण, आरोग्य, त्यांचा माज ओळखणे, कृत्रिम रेतन, गर्भधारणेचा काळ आणि विल्यानंतरची काळजी या सर्व घटकांकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

जनावरांची निवड

उत्तम प्रजननासाठी प्रथम योग्य जनावरांची निवड करणे गरजेचे आहे. कालवडी साधारण १२ ते १८ महिने वयाच्या तर वगारी २४ ते ३६ महिने वयाच्या झाल्यानंतर पैदासक्षम होतात. कालवडीचे वजन साधारण २५० किलो आणि वगारीचे ३०० किलो झाले की त्या माजावर येण्याची शक्यता अधिक असते. यासाठी पशुवैद्यकांकडून त्यांची नियमितपणे गर्भ तपासणी करणे आवश्यक आहे. गाईमध्ये प्रथम माज १५ महिन्यात आणि म्हशीमध्ये १८ महिन्यात येतो. गाईमध्ये २६ ते २८ महिन्यात पहिल्यांदा प्रसूती आणि म्हशीत ३२ ते ३६ महिन्यात होणे आदर्श मानले जाते. जन्मावेळी वासराचे वजन साधारण २५ ते ३० किलो असावे.

पैदाशीसाठी गाई-म्हशींची निवड करताना जनावरांची जात, त्यांचे आरोग्य याबाबतचा इतिहास आणि पूर्वीचे प्रजनन याकडे लक्ष द्यावे. दुग्धोत्पादनासाठी उच्च दूध उत्पादन देणाऱ्या जाती जसे संकरीत होलस्टाईन-फ्रिजियन, देशी जातीवंत गाई जसे गिर, साहिवाल, प्रादेशिक वातावरणात जुळवून घेणाऱ्या गाई जसे देवणी, खिल्लार, डांगी, लाल कंधारी, गवळाऊ तसेच म्हशीमध्ये मुऱ्हा, नागपुरी, पंढरपुरी, मराठवाडी म्हशी या आपल्याकडे असणाऱ्या चाऱ्याची उपलब्धतता तसेच व्यवस्थापन यानुसार निवडाव्यात. वारंवार गर्भपात होणाऱ्या जनावरांची पशुवैद्यकाकडून तपासणी करून घ्यावी. ऑक्टोबर ते मार्च महिन्याचा काळ गर्भधारणेसाठी उत्तम आहे. या काळात तापमान कमी असते आणि हिरवा चारा मुबलक मिळतो, ज्यामुळे गर्भधारणेचे यश ७०-८०% पर्यंत वाढते.

पोषण आणि आहार व्यवस्थापन

पोषण हे प्रजननाचे मुख्य घटक आहे. गाभण जनावरांना संतुलित आहार देण्यात यावा. ज्यात प्रथिने, ऊर्जा, खनिजे विशेषतः कॅल्शियम, फॉसफोरस, कोबाल्ट, कॉपर, जिंक, मँगनीज, आयोडीन, सेलेनियम, जिवनस्तव जसे अ, ड, ई, यांचा समावेश करावा आणि जनावरांना पिण्यासाठी स्वच्छ पाणी उपलब्ध असावे. गर्भधारणेच्या पहिल्या सहा ते सात महिन्यात वासरांची वाढ सावकाश असते, त्यामुळे सामान्य आहार पुरेसा असतो. परंतु, शेवटच्या तीन महिन्यात वासराचे वजन दुप्पट होते, म्हणून या कालावधीत अतिरीक्त आहार देणे आवश्यक आहे.

प्रजनन काळात प्रथिनांची कमतरता टाळा, अन्यथा गाई म्हशी माजावर येण्यात समस्या येतात. दुधाळ जनावरांना दुधाच्या प्रमाणानुसार ३००-४०० ग्रॅम प्रती लिटर संतुलित पशुखाद्य आणि ३०-५० ग्रॅम खनिज मिश्रण द्यावे. हिरवा चारा (जसे की बरसीम किंवा मका) मुबलक प्रमाणात द्यावे, ज्यात प्रथिने आणि खनिजे असतात. व्यायल्यानंतर ६० दिवसांत आवश्यकतेप्रमाणे जंतनाशन करावे. याशिवाय शरीर पोषणासाठी १.५ - २ किलो आहार द्यावा. अपुऱ्या आहारामुळे गर्भपात, कमी वजनाचे वासरे तसेच दूध कमी होणे या समस्या निर्माण होतात. जनावरांना सकस पशूआहार योग्य प्रमाणात दिल्यास संपूर्ण शारीरिक संतुलन व प्रजनन बळकट करण्याकरीता फायदा होतो. पशु आहारातील विविध घटकांच्या कमतरतेमुळे गाई म्हशी माजावर न येणे, माज कमी दाखवणे, कमी फलन होणे, भ्रूण मृत्यू यासारखे प्रकार दिसतात.

आरोग्य आणि लसीकरण

आरोग्य चांगले असल्यास प्रजनन यशस्वी होते. ब्रुसेल्लोसिस, लाळखुरकूत, फऱ्या, घटसर्प यासारख्या आजारांसाठी प्रतिबंधात्मक लसीकरण करून घ्यावे. व्यायल्यानंतर ६०-९० दिवसांत गाई म्हशी माजावर येणे अपेक्षित आहे. ते माजावर आले नसल्यास पशुवैद्यकाकडून तपासणी करून घ्यावी. गाभण जनावरांना वेगळे ठेवा, गोठा स्वच्छ आणि बाह्य परोपजीवीनाशक औषधांची वेळोवेळी फवारणी करा. कासदाह टाळण्यासाठी योग्य ती काळजी घ्यावी.

गर्भधारणा झाल्याची खात्री २-२.५ महिन्यांनी करावी. गाईमध्ये गाभण काळ हा साधारण २८० दिवसांचा तर म्हशीमध्ये हा ३१० दिवसांचा असतो. गर्भपात टाळण्यासाठी इतर रोगग्रस्त जनावरांपासून त्यांना दूर ठेवा. उष्णता कमी करण्यासाठी गोठ्यात थंड पाणी आणि पुरेशी सावली द्यावी. अशक्त जनावरांची विशेष काळजी घ्यावी, कारण त्यांना आजार लवकर होण्याची शक्यता असते.

माज ओळखणे आणि रेतन

माज ओळखणे हे प्रजननाचे मुख्य पाऊल आहे. माजाचे चक्र २१±२ दिवसांचे असते. लक्षणे: हंबरणे, अस्वस्थता, चारा कमी खाणे, योनीतून पारदर्शक स्राव, योनीची सूज, शेपटी उंचावणे, दूध कमी होणे. माजाचे योग्य निदान होण्यासाठी दिवसातून २-३ वेळा निरीक्षण करणे आवश्यक आहे.

माजाच्या काळास सुरुवात झाल्यानंतर १२-१८ तासांनी कृत्रिम रेतन करावे. सकाळी माज आल्यास सायंकाळी, सायंकाळी आल्यास दुसऱ्या दिवशी सकाळी रेतन करावे. नैसर्गिक किंवा कृत्रिम रेतनानंतर २१ दिवसांनी माज तपासावे. रेतनादरम्यान जनावरांना चारा व पाण्याचा किंवा अन्य शारिरीक ताण देऊ नका.

गाभण काळातील काळजी

गर्भधारणा झाल्यावर जनावरांना इतर जनावरांपासून वेगळे करावे. गोठ्यात मऊ गवत अंथरावे, रोज खरारा करावे. शेवटच्या दोन महिन्यांत दूध आटवणे आवश्यक असते. त्यांना या काळात अतिरीक्त आहार द्यावा. प्रथिने, कॅल्शियम, फॉस्फरस. दूरवर चालणे टाळा, मारणे टाळा. गर्भपाताची लक्षणे (जसे की योनीतून रक्त) दिसल्यास ताबडतोब पशुवैद्यक बोलवा.

विण्याच्या वेळी व नंतरची काळजी

विण्याच्या काळ २-३ तासांचा असतो. पहिले वेत असल्यास विण्यासाठी ४-५ तास लागू शकतात. व्यायल्यानंतर वासराचे अंग कोरडे करा, झार पुरून टाकावा आणि गाई/ म्हशीस वासराला चाटू द्यावे. वासराची नाळ शरीरापासून २.५ ते ५ सेंमी अंतराने कापून आयोडिन लावावे. जन्मलेल्या वासराला पहिल्या अर्ध्या तासात चिक पाजावा; जेणेकरून चिकातले आवश्यक घटकांचे आतड्यातून लवकर शोषण होईल. व्यायल्यानंतर गाई म्हशीला मुबलक आहार द्यावा. **दोन वेतातील अंतर:** गाईमध्ये १२-१३ महिने आणि म्हशीमध्ये १४-१५ महिने ठेवावे. विल्यानंतर झार अडकल्यास पशुवैद्यक बोलावून आवश्यक उपचार करावेत. उत्तम प्रजननासाठी गाई-म्हशींचे नियमित निरीक्षण, संतुलित आहार, आरोग्याची काळजी घेणे आवश्यक आहे. पशुपालकांनी पशुवैद्यकांच्या सल्ल्याने याबाबत नियोजन करणे आवश्यक आहे. यामुळे दूध उत्पादन २०-३० टक्के वाढून व्यवसाय अधिक फायदेशीर होतो.

मुऱ्हा

नागपुरी

मराठवाडी

पुर्णाथडी

लालकंधारी

नांदेड जिल्ह्यातील कंधार परिसरात स्थानिक शेतकरी लाल रंगाच्या गुरांचे पालनपोषण करत होते. त्या परिसरावर कंहर नावाच्या राजाचा राज्यकारभार होता. राजा कंहर यांचे नाव आणि गुरांचा लाल रंग या दोन्हींच्या संयोगाने या गुरांना "रेड कन्हारी" असे नाव देण्यात आले. सन १९७५ ते १९८० या काळात केंद्र शासनामार्फत परभणी पशुवैद्यकीय महाविद्यालयाने स्थानिक रेड कन्हारी गुरांचे सर्वेक्षण केले. सन १९८९ साली राष्ट्रीय पशु आनुवंशिक संसाधन ब्यूरो (NBAGR), करनाल यांनी या गुरांना राष्ट्रीय स्तरावर "रेड कंधारी" या नावाने स्वतंत्र जात म्हणून मान्यता दिली. अशाप्रकारे हा गोवंश नांदेड जिल्ह्यासाठी एक मौल्यवान पशुधन ठरली आहे.

डॉ. शशिकांत बी. भालके
पशुधन विकास अधिकारी
पशुवैद्यकीय चिकित्सालय, अंबुलगा,
ता. कंधार, जि. नांदेड

लालकंधारी गोवंशाची वैशिष्ट्ये:

आकार: मध्यम आकाराची, मजबूत, सघन शरीरयष्टी असलेली आणि आकर्षक दिसणारी.
शरीराचा रंग: फिकट लाल ते गडद तपकिरीपर्यंत.
बैल: गाईंपेक्षा अधिक गडद रंगाचा, विशेषतः छाती व **मागील भाग** (कंबर व शेपूटाजवळ) अधिक गडद.
कपाळ: रुंद.
डोळे: चमकदार, डोळ्यांभोवती काळी वलये,
कान: लांब, जमिनीच्या समांतर, टोक काळ्या रंगाचे.
शिंगे: मध्यम आकाराची, सम प्रमाणात वळलेली.
कुबड: मध्यम आकाराचा.
गळपट्टा (Dewlap): मध्यम आकाराचा.
शेपूट: लांब, पायाच्या हॉक सांध्याखाली पोहोचणारी, शेवटी काळा झुबका (टोक).
खुर: काळे.
सडांचा रंग: काळा.खुरावरील वलये: काळी.
नाभीचा भाग (Naval flap): शरीराला चिकटलेला.
जांघेचा भाग (Inguinal region): अधिक गडद रंगाचा.

उपयोगिता: लालकंधारी या पशुधनाची उपयोगिता शेती व ओढकामासह पशुसंवर्धनाच्या व्यवसायासाठी अधोरेखित होत आहे.
उपयोग: ओढ कामासाठी (Draft purpose breed).
हवामान सहनशक्ती: कोणत्याही प्रकारच्या हवामानात तग धरणारी जात.
शेतीकामातील उपयोग: शेतीच्या विविध कामांसाठी उत्कृष्ट ओढ शक्ती असलेली.
ओढ शक्ती: ०.८० ते १.५० अश्वशक्ती (Horse Power).
वखरणीचा वेग (Harrowing): ताशी १५८६ चौरस मीटर.
नांगरणीचा वेग (Ploughing): ताशी ५६२ चौरस मीटर.
मालवाहतुकीसाठी (Carting of load):
१५ क्विंटल वजन ४.२ कि.मी. / तास या वेगाने ओढू शकते.
२० क्विंटल वजन ३.६ कि.मी. / तास या वेगाने ओढू शकते.
दूध उत्पादनासाठी (Milking purpose):
दररोज साधारणतः ३ लिटर दूध.
२८० दिवसांच्या दुभत्या कालावधीत एकूण दूध उत्पादन ६०० लिटर

संवर्धन

नांदेड जिल्ह्यातील रेड कंधारी गाईंचे मालक पारंपरिक पद्धतीने या गुरांचे पालनपोषण करतात. संशोधनातून असे आढळले की नांदेड जिल्ह्यातील बहुतांश शेतकरी प्रादेशिक स्थानिक गुरांच्या जातींचे पालन करतात. रेड कंधारी, देवनी (Deoni) तसेच स्थानिक / अवर्गीकृत (non-descript) जातींचे पालन सर्वसाधारणपणे केले जाते. या मौल्यवान जातीचे संवर्धन करण्यासाठी आपण पशुसंवर्धन विभाग (AHD) यांनी सुचविलेली प्रजनन धोरणे अवलंबू शकतो.

१. निवड केलेले प्रजनन बैल (Breeding bulls) जातीच्या मूळ प्रदेशात (घराच्या परिसरात) नैसर्गिक संकरणासाठी कळपांमध्ये किंवा गावांमध्ये आणणे.

२. खरे, प्रमाणित आणि मूळ भारतीय जातींचे गोठवलेले वीर्य (Frozen semen) उपलब्ध करून देणे, जेणेकरून जातीच्या मूळ प्रदेशात कृत्रिम रेतन (AI) करता येईल, तसेच अशा जातींच्या गायींसाठी इतर भागातही वापरता येईल.

३. स्थानिक (मूळ) जातींचा नाश होऊ नये यासाठी संकर प्रक्रियेवर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. यासाठी गाई-बैल मालकांना योग्य शिक्षण आणि मार्गदर्शन देणे गरजेचे आहे.

४. जातीच्या मूळ प्रदेशातील सर्व अवर्गीकृत (non-descript) बैलांचे **खच्ची**करण (castration) करणे आवश्यक आहे.

५. स्थानिक जातींच्या संकररहित प्रजननासाठी, **खच्ची**करण कार्यक्रमादरम्यान भारतीय मूळ जातींचे प्रजनन बैल **खच्ची**करण होणार नाहीत याची काळजी घेतली जाईल. तथापि, मालकाच्या इच्छेनुसार किंवा शेतीकामासाठी जेथे सौम्य (docile) प्राणी आवश्यक असतील, तेथे अशा बैलांचे खच्चीकरण करण्यास परवानगी दिली जाईल.

प्रतिजैविके: कार्य आणि महत्त्व

"ॲंटिबायोटिक्स" हा शब्द आता सर्वपरिचित झाला आहे. मराठीत "ॲंटिबायोटिक्स" म्हणजे "प्रतिजैविके", परंतु हा शब्द अनेकांना अजूनही नवीन वाटतो. या प्रतिजैविकांमुळे मानव व प्राण्यांच्या आरोग्यात आमूलाग्र बदल घडून आला आहे. आरोग्यमय जीवनासाठी प्रतिजैविकांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. त्याविषयी...

डॉ. शिवानी रत्नाकर मुरळे
पशुधन विकास अधिकारी (कं.)
राष्ट्रीय पशुधन अभियान (NLM)
पशुसंवर्धन आयुक्तालय, पुणे-६७

प्रतिजैविकांची व्याख्या आणि उत्पत्ती: प्रतिजैविके ही जिवंत जीवाणूंपासून तयार झालेली किंवा मानवनिर्मित रासायनिक संयुगे असतात. ती जीवाणूंचा नाश करतात किंवा त्यांच्या वाढीस प्रतिबंध करतात. बहुतेक प्रतिजैविके मृदेमधील जीवाणू किंवा कवक (फंगस) यांपासून निर्माण होतात. ही संयुगे नैसर्गिक वातावरणात सूक्ष्मजीवांच्या वाढीवर नियंत्रण ठेवण्याचे कार्य करतात. मृदेतील जीवाणूंची अनिर्बंध होणारी वाढ प्रतिजैविकांमुळे नियंत्रित होत असते जी प्रतिजैविके शरीरातील पेशींना अपाय न करता केवळ रोगकारक जीवाणूंना नष्ट करतात, त्यांचा वैद्यकात औषधे म्हणून वापर होतो.

इतिहास

काही दशकांपूर्वी अनेक संसर्गजन्य आजार जीवघेणे ठरत असत. आज त्या आजारांविरुद्ध प्रभावी लसी आणि प्रतिजैविके उपलब्ध असल्यामुळे मृत्यूदर मोठ्या प्रमाणात कमी झाला आहे. २० व्या शतकात ॲंटिबायोटिक्सचा शोध हा वैद्यकीय इतिहासातील क्रांतिकारी टप्पा ठरला. सन १९२९ मध्ये अलेक्झांडर फ्लेमिंग यांनी पेनिसिलीन या बुरशीजन्य घटकाचा शोध लावला. या घटकाने रोगजंतूंविरुद्ध प्रभावी लढा देण्याची क्षमता दाखवली. मात्र, त्या वेळी पेनिसिलीनचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन शक्य नव्हते. बुरशी पासून पेनिसिलीन मिळवण्याची पद्धत विकसित झाली नसल्याने पेनिसिलीनचा खरा वापर सन १९४१ नंतरच सुरू झाला.

सन १९४१ मध्ये फ्लोरे आणि चेन या शास्त्रज्ञांच्या समूहाने पेनिसिलीन मिळवण्याची कार्यक्षम पद्धत विकसित केली. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात पेनिसिलीनचा वापर जखमी सैनिकांचे प्राण वाचवण्यासाठी मोठ्या प्रमाणात झाला. त्यानंतर सल्फोनामाइड, ऑक्सिटेट्रासायक्लिन, सेफॅलोस्पोरिन, क्विनोलोन्स इत्यादी अनेक प्रतिजैविकांचा शोध लागला.खरं तर १९१० मध्ये साल्वरसन (Salvarsan) हे पहिले कृत्रिम प्रतिजैविक वैद्यकीय क्षेत्रात वापरले गेले, आणि पुढील शतकभर आधुनिक औषधशास्त्राला अनेक प्रतिजैविकांची भर पडत गेली.

प्रतिजैविकांचे कार्य आणि महत्त्व:

प्रतिजैविके रोगकारक सूक्ष्मजीवांवर निवडक परिणाम करतात. जीवाणू पेशी आणि प्राणी पेशी यांच्यातील मुख्य फरक म्हणजे जीवाणू पेशीला पेशीभित्तिका असते. प्रतिजैविके त्या भित्तिकेवर परिणाम करून जीवाणूंचा नाश करतात.

प्रतिजैविकांच्या इतिहासातील काही महत्त्वाचे टप्पे
- १९००: मातीतील जीवाणूंच्या प्रतिजैविक क्षमतेचा अभ्यास सुरू
- १९०७-१९१०: साल्वरसनच हे पहिले कृत्रिम प्रतिजैविक
- १९२०: Actinomyces या जिवाणूच्या प्रतिजैविक क्षमतेचा शोध
- १९३०: पेनिसिलीनचा शोध
- १९४०: अमिनोग्लायकोसाइड्स, टेट्रासायक्लिन्स, क्लोरॅम्फेनिकॉल यांचा शोध.

प्रतिजैविकांचे वर्गीकरण

प्रकार	वर्गीकरण
कार्यपद्धतीनुसार	I. **सेल वॉल इन्हिबिटर्स:** पेनिसिलिन, सेफालोस्पोरिन II. **सेल मेंब्रेनवर परिणाम करणारी:** पॉलिमिक्सिन, अँफोटेरिसिन-B III. **प्रथिन निर्मिती रोखणारी:** टेट्रासायक्लिन, क्लोरॅम्फेनिकॉल IV. **केंद्रकाच्या (DNA) चयापचयात हस्तक्षेप करणारी:** क्विनोलोन्स, रिफॅम्पिसिन
रासायनिक रचनेनुसार	I. **सल्फोनामाइड्स** II. **क्विनोलोन्स :** एन्रोफ्लॉक्सासिन III. **डायमिनोपायरीमिडिन्स :** ट्रायमिथोप्रिम IV. **बीटा-लॅक्टम्स :** पेनिसिलिन, अमॉक्सिसिलिन V. **अमिनोग्लायकोसाइड्स :** स्ट्रेप्टोमायसिन, जेंटामायसिन VI. **टेट्रासायक्लिन समूह :** ऑक्सिटेट्रासायक्लिन, डॉक्सिसायक्लिन VII. **मॅक्रोलाईड्स :** इरिथ्रोमायसिन, अझिथ्रोमायसिन
जंतूंच्या प्रकारानुसार	I. **जिवाणूविरोधी** - पेनिसिलिन, अमिनोग्लायकोसाइड्स II. **बुरशीविरोधी** - अँफोटेरिसिन-B, ग्रिसिओफुल्विन III. **विषाणूविरोधी** - ॲसायक्लोव्हिर, विडारॅबिन IV. **प्रोटोजोआविरोधी** - मेट्रोनिडॅझोल V. **अंतःपरजीवीविरोधी** - अल्बेंडाझोल, लिवामिसोल VI. **बाह्यपरजीवीविरोधी** - सायपरमिथ्रिन
कार्यक्षमतेनुसार	I. **नॅरो स्पेक्ट्रम:** पेनिसिलिन-G, स्ट्रेप्टोमायसिन II. **ब्रॉड स्पेक्ट्रम:** टेट्रासायक्लिन, क्लोरॅम्फेनिकॉल
कार्याच्या स्वरूपानुसार	I. **बॅक्टेरिओस्टॅटिक (वाढ रोखणारी):** सल्फोनामाइड्स, क्लोरॅम्फेनिकॉल II. **बॅक्टेरिसाइडल (जीवाणू नष्ट करणारी):** पेनिसिलिन, स्ट्रेप्टोमायसिन
उत्पत्तीनुसार	I. **नैसर्गिक प्रतिजैविके:** पेनिसिलिन, टेट्रासायक्लिन, ग्रिसिओफुल्विन II. **कृत्रिम प्रतिजैविके:** सल्फोनामाइड्स

प्रतिजैविकांची निवड करताना हे लक्षात ठेवा:

१. रोगजंतूंची ओळख: योग्य प्रतिजैविक निवडण्यासाठी रोगजंतूंची ओळख करणे अत्यावश्यक असते कारण वेगवेगळ्या जंतूंसाठी वेगवेगळी प्रतिजैविके कार्य करतात. प्रयोगशाळेतील तपासणीनंतर जंतूंची ओळख पटते परंतु काही वेळा प्रयोगशाळेत नमुने पाठवणे शक्य नसते अशावेळी पूर्वानुभव व आजाराची विशिष्ट लक्षणे यावरून जंतू ओळखता येतात.

२. जंतूंचा प्रतिसाद: काही जंतू विशिष्ट प्रतिजैविकांना प्रतिसाद देत नाहीत, म्हणून संवेदनशीलता चाचणी (antibiotic sensitivity test) करणे महत्त्वाचे.

३. प्रतिजैविकांची क्षमता आणि कार्यपद्धती: बऱ्याच वेळा रोग जंतू उपचारास प्रतिसाद देत नसल्यास अथवा जंतूंची ओळख न पटल्यास मोठ्या क्षमतेची म्हणजेच ब्रॉड् स्पेक्ट्रम प्रतिजैविके वापरावी लागतात. म्हणजेच अशा प्रतीजैविकांची कार्यक्षमता विविध जंतूंच्या विरोधात दिसून येते. इतर वेळी कमी क्षमतेची प्रतिजैविके वापरल्यास फायदा होतो.

४. शरीरातील औषधगतिकी (Pharmacokinetics): शरीराचा प्रतिजैविकांसोबतचा प्रतिसाद: म्हणजेच प्रतिजैविक शरीरात गेल्यानंतर शरीर त्याचे शोषण, वितरण, चयापचय आणि शरीराबाहेर टाकणे ही कामे करीत असते.

वरील चार गोष्टी चांगल्या प्रकारे झाल्यास औषधांची उपयुक्तता वाढते.

५. देण्याचा मार्ग: प्रतिजैविके कुठल्या मार्गाने शरीरामध्ये प्रवेश करतात यावर त्याचे पुढील परिणाम अवलंबून असतात, म्हणजेच तोंडावटे अथवा इंजेक्शनद्वारे, तोंडावाटे दिल्यास परिणाम उशिरा दिसतो तर इंजेक्शनद्वारे तो लवकर दिसतो.

६. इतर औषधांशी कनेक्टीव्हीटी: बऱ्याच वेळा प्रतिजैविकांसोबत इतर औषधे द्यावे लागतात आणि अशी औषधे प्रतिजैविकांच्या कार्यात मदत करणारी असल्यास फायदाच होतो.

७. प्रतिजैविकांचे विपरीत परिणाम: काही प्रतिजैविके ही शरीरात गेल्यानंतर अनपेक्षित व विपरीत परिणाम दाखवत असतात. त्यामुळे आजाराच्या स्वरूपानुसार प्रतिजैविकांचे साईड इफेक्ट व फायद्याचा अभ्यास करूनच प्रतिजैविकांची निवड केली पाहिजे.

८. प्रतिजैविकांचे अर्थशास्त्र: प्रतिजैविकांच्या किमतीनुसार त्यांची निवड करणे महत्त्वाचे ठरते.

९. बाधित जनावरांनुसार प्रतिजैविकांची निवड: जनावरांची प्रतिकारक्षमता, आजारांची तीव्रता, मूत्रपिंडांचे आरोग्य, यकृताची कार्यक्षमता इ.बाबींचा विचार करून योग्य ते प्रतिजैविक निवडावे.

१०. प्रतिजैविकांचा एकत्रित वापर: बऱ्याच वेळा उपचाराची गरज म्हणून एकापेक्षा अधिक प्रतिजैविके एकत्रित वापरली जातात. परंतु त्यांचे वेगवेगळे परिणाम दिसू शकतात जसे की, एकत्रित परिणाम खूप चांगला म्हणजेच सिनर्जीस्टिक किंवा विरोधी म्हणजेच एंटागोनिझम असा असू शकतो. काही ठराविक परिस्थितीमध्ये प्रतिजैविके एकत्रित दिली जातात. जसे की, प्रतिजैविक क्षमता वाढवण्यासाठी, अनेक रोगजंतूंमुळे आजार असल्यास, रोगजंतूकडून रेजिस्टन्स कमी करण्यासाठी तसेच प्रतिजैविकांचे विपरीत परिणाम टाळण्यासाठी.

११. रोगप्रतिबंधासाठी होणारा प्रतिजैविकांचा वापर: प्रतिजैविके फक्त रोग उद्भवल्यावर उपयोगी पडतात असे नाही तर अनेक वेळा रोगांचा प्रतिबंध करण्यासाठी सुद्धा वापर केला जातो जसे की शरीरातील शरीरावरील जखमा शस्त्रक्रियेनंतर, जनावर विल्यानंतर, विषाणूजन्य आजारांमध्ये, मोठ्या प्रमाणात रोगाचा प्रादुर्भाव आढळून येत असल्यास प्रतिजैविकांचा प्रतिबंधात्मक असा वापर केला जातो.

प्रतिजैविकांचे दुष्परिणाम: प्रतिजैविकांचा वापर काळजीपूर्वक व योग्य प्रमाणात न केल्यास दुष्परिणामदेखील घडून येतात आणि क्वचितप्रसंगी रुग्णाचा मृत्यू होऊ शकतो. प्रतिजैविकांचे दुष्परिणाम पुढीलप्रमाणे दिसून येतात:

(१) काही रुग्णांमध्ये अंगावर पुरळ उठणे व ताप येणे अशी लक्षणे दिसतात. पेनिसिलीनच्या वापरामुळे ही शक्यता दाट असते. म्हणूनच डॉक्टर रुग्णाला प्रतिजैविकाची ॲलर्जी आहे किंवा नाही, याची खात्री करून घेतात. रुग्णाला विशिष्ट प्रतिजैविकाची ॲलर्जी असल्यास डॉक्टर त्याच गुणधर्माचे, परंतु भिन्न रासायनिक संघटन असलेले प्रतिजैविक देतात.

(२) काही प्रतिजैविकांचा वापर अधिक प्रमाणात आणि दीर्घकाळ केल्यास इंद्रिय व ऊती यांना धोका पोहोचतो. उदा., स्ट्रेप्ट्रोमायसीनच्या अतिवापरामुळे मूत्रपिंड काम करेनासे होते किंवा बहिरेपणा येतो. त्यामुळे दुसरे कोणतेही प्रतिजैविक परिणामकारक ठरत नसेल, तर डॉक्टर अशा प्रतिजैविकांचा वापर करतात. कर्करोगावरील प्रतिजैविके ज्या पेशींचे विभाजन वेगाने होते अशा सर्व पेशींविरुद्ध कार्य करतात. त्यामुळे निरोगी पेशींवरही त्याचा परिणाम होऊ शकतो. उदा., अस्थिमज्जेमध्ये सतत पेशीविभाजन होऊन नवीन पेशी तयार होत असतात. अस्थिमज्जेतील रक्तजनक पेशींवर प्रतिजैविकांचा परिणाम होऊन पांढऱ्या पेशींची संख्या कमी होते व किरकोळ संसर्गालाही रुग्ण बळी पडू शकतो.

पशुधनातील वंध्यत्व: कारणे व उपाय

डॉ. शुभम बेलखेडे
पशुधन विकास अधिकारी (कं.),
राष्ट्रीय पशुधन अभियान,
पशुसंवर्धन आयुक्तालय, औंध, पुणे-६७

उत्तम प्रजनन हे चांगल्या दूधउत्पादनाचे मूळ आहे. त्यामुळे उत्तम दूधउत्पादनासाठी जनावरांची प्रजननक्षमता टिकवणे आवश्यक असते. जनावरांमध्ये वंध्यत्व (Infertility) म्हणजे संयोग करण्याची इच्छा किंवा क्षमता नसणे, गर्भधारणा न होणे, भ्रूणाचे योग्य पोषण न होणे किंवा सामान्य वासरू आणि गर्भावरण बाहेर टाकण्यास असमर्थता अशी अवस्था होय.

वंध्यत्वासाठी थेट किंवा अप्रत्यक्षपणे कारणीभूत ठरणारे अनेक घटक असतात. त्यात प्रामुख्याने खालील घटकांचा समावेश होतो,

जन्मतः व जन्मानंतर उद्भवलेले शरीररचनात्मक दोष:- यात जन्मतः उद्भवलेल्या दोषांमध्ये अंडाशयाची अपूर्ण वाढ, अंडाशयाचा अभाव, दुहेरी गर्भाशय, गर्भाशय ग्रंथींचा अभाव, फ्रिमार्टिन अवस्था ज्यामध्ये दोन जुळ्या पिल्लांमध्ये जर एक नर (bull calf) आणि एक मादी (heifer calf) असेल तर त्यातील मादी वंध्य असण्याची शक्यता जास्त असते. जन्मानंतर उद्भवलेल्या दोषांमध्ये प्रसूतीनंतरचा संसर्ग, अंडाशयाचे ट्युमर, अंडाशय, गर्भाशय, कमळमुख इत्यादींचा दाह हे दोष आढळतात. जन्मतः उद्भवलेल्या दोषांवर कुठलाही उपचार नसतो. तर जन्मानंतरच्या दोषांवर तज्ञ पशुवैद्यकांकडून योग्य निदान करून प्रतिजैविके, संप्रेरके व इम्युनोमोड्युलेटर्सचा वापर करून उपचार करता येतात.

व्यवस्थापनातील चुका:- बऱ्याचदा शारीरिक दृष्ट्या निरोगी तसेच कुठलाही संसर्ग किंवा जीवनसत्व, खनिजे यांचा कसलाच अभाव नसणारे जनावरसुद्धा वंध्यत्वाने ग्रासलेले दिसून येते. अशा जनावरांमध्ये संगोपनाच्या व्यवस्थापनातील चुका त्याच्या वंध्यत्वाचे कारण असू शकतात. यात माजाची स्थिती न ओळखणे, योग्य वेळी कृत्रिम रेतन न होणे, उष्णतेचा ताण, अयोग्य कृत्रिम रेतन तंत्र या बाबी कारणीभूत ठरतात.

उपाय:

i. **माजाच्या लक्षणांची अचूक ओळख:** अस्वस्थ राहणे, वारंवार लघवी करणे, भूक मंदावणे, शेपटी उंचावणे, इतर जनावरांवर उडणे, सतत ओरडणे, योनीवरील सूज व योनीतून चिकट स्राव बाहेर पडणे.

ii. **माजाचा कालावधी** योग्य प्रकारे नोंद केलेला असल्यास रेतनाची योग्य वेळ ठरवणे सहज शक्य होते.

iii. सर्वसाधारणपणे, माजाच्या उतरत्या काळात, माज संपण्यापूर्वी ६ ते १२ तास अगोदर कृत्रिम रेतन अपेक्षित असते. गावठी गायी-म्हशींमध्ये माज दिसून आल्यास लगेच कृत्रिम रेतन करावे. देशी शुद्ध वंशाच्या गायी-म्हशींमध्ये माज दिसून आल्यास १२ तासानंतर, संकरीत गायीमध्ये माज दिसून आल्यास २४ तासानंतर, विदेशी गायीमध्ये माज दिसून आल्यास ३६ तासानंतर कृत्रिम रेतन करावे.

iv. गोठीत रेत मात्रांना योग्य रीतीने (३७° C ला ३०-६० सेकंद) वितळवून योग्य गर्भाधान तंत्राचा अवलंब करावा.

३. पोषक घटकांमुळे उद्भवणारे वंध्यत्व:- विविध सूक्ष्म खनिजांची कमतरता (कोबाल्ट, तांब, आयोडीन, मॅंगनीज, जस्त), जीवनसत्व अ, ब, ड, इ चा अभाव, ऊर्जा प्रथिनांचे असंतुलन.

उपाय: जनावरांच्या खाद्यामध्ये हिरव्या चाऱ्याचा समावेश करावा. शरीरयष्टीनुसार १-२ किलो खुराक द्यावा. दररोज किमान २०-३० ग्राम खनिज मिश्रण द्यावे.

४ उलटणारा माज (REPEAT BREEDING SYNDROME):- अशा गायी-म्हशीं ज्यामध्ये सलग ३ किंवा त्यापेक्षा जास्त अयशस्वी रेतन झालेले असते, दोन माजांमधील अंतर हे सामान्यपणे २१ दिवसांचे असते. आणि ज्या किमान एकदा व्यायल्या असतात.

कारणे:

१. **फलन न होणे-** repeat breeding मध्ये फलन न होण्याचे प्रमाण २८-४४% आहे. स्त्रीबीज न सुटणे किंवा उशिराने सुटणे, बिजांडातील दोष, शुक्राणूंमधील दोष यामुळे फलन होण्यास अडथळा येऊ शकतो.

२. **भ्रूण मृत होणे-** गर्भाशयाचे प्रतिकूल वातावरण, संप्रेरकांचा असमतोल, ट्रायकोमोनस, कॅम्पिलोबॅक्टर, ब्रुसेल्ला यांसारख्या संक्रमणातून होऊ शकते.

उपाय:

संतुलित आहार, खनिज मिश्रण आणि जीवनसत्वे यांच्या माध्यमातून जनावरांचे शारीरिक संतुलन सुधारणे, माजावर आल्यानंतर १२ तासांच्या अंतरावर २ वेळा कृत्रिम रेतन करणे, उच्च प्रतीच्या वीर्य मात्रांचा वापर करणे, प्रतिजैविके व संप्रेरकांचा योग्य वापर करणे, प्रजनन संस्थेमध्ये संसर्ग झालेला असल्यास गर्भाशयात टाकण्याच्या औषधींचा वापर करणे.

५. माजावर न येणे (Anestrus)**:** या अवस्थेमध्ये एक तर जनावर माजावर येत नाही किंवा त्याच्या माज हा ओळखू येत नाही ज्याला मुका माज असे म्हणतात.

कारणे:

जास्त दुधामुळे होणारे नकारात्मक ऊर्जा संतुलन, ल्युटियल सिस्ट, ममीकृत गर्भ, पायोमेट्रा, म्यूकोमेट्रा, हायड्रोमेट्रा, गर्भाशय ग्रंथीचा अभाव, टीबी, एफएमडी, ॲक्टिनोमायकोसिस यांसारखे दीर्घकालीन आजार, अंतर्गत आणि बाह्य परजीवींचा प्रादुर्भाव.

उपाय:

जनावरांना मका, ज्वारी, बाजरी यांसारख्या उर्जायुक्त धान्यांचे मिश्रण द्यावे, कोरड्या चाऱ्याबरोबरच हिरव्या चाऱ्याचा समावेश करावा. दररोज ५ ग्रॅम कॉपर सल्फेट ७ दिवस द्यावे. फॉस्फरस व जीवनसत्व अ चे इंजेक्शन द्यावे. गरजेनुसार संप्रेरकांचा वापर करावा. जनावरांचे तसेच गोठ्याचे जंतनिर्मुलन करून घ्यावे.

समतोल आहार, स्वच्छ गोठा, जंतनिर्मुलन, प्रजननसंस्था तपासणी, प्रमाणित वीर्यमात्रांचा वापर, माजचक्र नोंदी व योग्य व्यवस्थापन या उपाययोजनांनी वंध्यत्व कमी करता येते आणि जनावरांची प्रजननक्षमता वाढवता येते.

कृत्रिम रेतन - शास्त्रोक्त पद्धत व कायदे

डॉ. सौरभ दहेकर
पशुधन विकास अधिकारी (कं.),
महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरण,
पशुसंवर्धन आयुक्तालय, औंध, पुणे-६७

आजच्या युगात पशुपालन हा केवळ परंपरागत व्यवसाय न राहता विज्ञानाधारित आणि तंत्रज्ञानाधारित क्षेत्र बनले आहे. पशुधनाच्या उत्पादनक्षमतेत आणि गुणवत्तेत सातत्याने वाढ करण्यासाठी कृत्रिम रेतन (Artificial Insemination - A.I.) हे एक प्रभावी वैज्ञानिक तंत्रज्ञान ठरले आहे. या पद्धतीमुळे उच्च दर्जाच्या नर जातींचे गुणधर्म सामान्य पशुपालकांपर्यंत पोहोचवून पशुधनाचे जनुकशुद्धीकरण शक्य होते.

कृत्रिम रेतन:

भारतामध्ये कृत्रिम रेतनाचा प्रसार १९५० नंतर झाला. राज्यामध्ये २० व्या पशुगणनेनुसार ३.३१ कोटी पशुधन आहे त्यापैकी एक कोटी ३९ लाख गोवंश व ५६ लक्ष म्हैसवर्गीय पशुधन आहे. राज्यामध्ये सन २४-२५ मध्ये गाईमध्ये १६ लाख ४२ हजार व म्हशीमध्ये ६ लाख ८५ हजार इतके कृत्रिम रेतन करण्यात आलेले आहे.

कृत्रिम रेतनाचे फायदे

- **जनुकशुद्धीकरण:** उत्कृष्ट वळूंच्या वीर्यामुळे जाती सुधारणा होते.
- **रोग नियंत्रण:** नैसर्गिक रेतनाद्वारे पसरणारे ब्रुसेलोसिस, ट्रायकोमोनायसिस व इतर प्रजनन रोगांचा प्रसार कमी होतो.
- **उत्पादनक्षमता वाढ:** श्रेष्ठ व सिद्ध वळूचा जास्तीत जास्त प्रमाणात वापर करून पुढील पिढ्यांत दूध उत्पादनात भरीव वाढ.
- **आर्थिकदृष्ट्या फायदेशीर:** प्रत्येक वळूचा उपयोग हजारो माद्यांसाठी करता येतो, त्यामुळे कमी खर्चात पशुपालकांना सिद्ध नराचे रेत उपलब्ध होते.
- **प्रजनन कार्यक्षमतेत वाढ:** प्राण्यांच्या प्रजनन दरात आणि गाभण होण्याच्या टक्केवारीत वाढ होते.
- **वैज्ञानिक व्यवस्थापन:** प्रजनन कार्यक्रमाचे नियोजन सुलभ होते.

कृत्रिम रेतनाची शास्त्रोक्त प्रक्रिया

अचूक कृत्रिम रेतन (Artificial Insemination) होण्यासाठी स्त्रीबीज सुटण्याची वेळ व शुक्राणू उपलब्धता यामध्ये अचूक जुळवाजुळव होणे अत्यंत महत्त्वाचे असते. साधारणत: माज उतरत्या अवस्थेत, म्हणजेच संपण्याच्या ६-१२ तास आधी रेतन केले असता, फलनाची शक्यता जास्त राहते. पर्यावरणीय ताण टाळण्यासाठी रेतनाची वेळ सकाळी लवकर /सायंकाळी उशिरा असावी.

१. रेतनपूर्व निरीक्षण

रेतन करण्यापूर्वी जनावर इस्ट्रस (माजावर) आहे का, हे तपासणे सर्वात महत्त्वाचे. खाली माजाची मुख्य लक्षणे दिली आहेत:

बाह्य वर्तणूक	लैंगिक वर्तणूक	प्रजननसंस्थेतील बदल
चारा पाण्याकडे दुर्लक्ष करणे	समागमोत्सुकता	सतत मूत्र विसर्जन करणे.
अस्वस्थता / बेचैनी वाढणे.	वळूकडे धाव घेणे.	निरणास सूज येणे.
सतत हालचाल, सजगता.	लैंगिक प्रदर्शन	योनी लालसर होणे.
दिर्घ हेल काढून ओरडणे.	लैंगिक गंध परीक्षण	शेपटी उंचावणे.
दूध उत्पादनात अल्प घट होणे	अनियंत्रित बदल	योनीतून काचेसारखा स्वच्छ स्राव स्रवतो.
प्रतिकार व आक्रमकता वाढणे.		योनीमार्ग पुर्ववत होणे.

२. रेतनपूर्व तयारी

- कृत्रिम रेतनासाठी दवाखान्यात आणलेल्या जनावरास तपासणीपूर्व २० मिनिटांची विश्रांती द्यावी.
- रेतनापुर्वी जनावरांच्या प्रजननाच्या नोंदी, माजाच्या नोंदी, रेतनाच्या नोंदी, पूर्व उपचार पडताळाव्यात.
- प्राणी व रेतन स्थान स्वच्छ आणि निर्जंतुक ठेवावे.
- वीर्यमात्रा ३७°C तापमानात ३०-४० सेकंद डीफ्रॉस्ट करावी.

३. रेतन प्रक्रिया

- सर्वप्रथम कटी भाग, योनीमार्ग, निरण यावर शेणाचा जमा झालेला थर कापूस / टिश्यू पेपर / स्वच्छ कपड्याने पुसून कोरडा करुन घ्यावा.
- रेतनाची गन योनीमार्गात ४५ अंश कोनात वरच्या बाजूस सरकवताना योनी मार्गाच्या कुठल्याही भागास स्पर्श करणार नाही, याची काळजी घ्यावी.
- रेतनाची गन यानंतर सरळ रेषेत अलगदपणे गर्भाशयमुखाकडे सरकवावी. रेतनाच्या योग्य ठिकाणी रेत थेंबा थेंबाने पडेल अशाप्रकारे सोडावे.
- रेतनानंतर गन योनीमार्गाच्या खालच्या बाजूस स्पर्श करत हळूहळू काढत घ्यावी, म्हणजे लैंगिक उत्तेजना आणि आंकुचने निर्माण होतील.
- रेतन कार्य करताना जनावराची हालचाल होणार नाही, अस्वस्थ होणार नाही, तसेच रेतन गनमुळे जननेंद्रीयास इजाही होणार नाही, याची काळजी घ्यावी.

४. रेतनानंतरची काळजी

- रेतनगन बाहेर काढल्याबरोबर तिच्या मुखाशी रक्त / पूजन्य बळस नाही, याची खात्री करावी.
- वापरलेली रेतमात्रा फेकून देण्यापुर्वी त्यावरील वळू क्रमांक, वळू जात, रेतनिर्मिती संस्था, वर्ष याची कटाक्षाने नोंद घ्यावी.
- जनावराला तणावमुक्त ठेवावे, जास्त हालचाल टाळावी.
- ४५ ते ६० दिवसांनी गाभण तपासणी करावी.
- पशुधनास संतुलित आहार, स्वच्छ पाणी व योग्य पोषण द्यावे.

पशुपालकांचा सहभाग

कृत्रिम रेतन यशस्वी होण्यासाठी तांत्रिक कौशल्याबरोबरच पशुपालकांचा सक्रिय सहभाग हा सर्वात महत्वाचा आधारस्तंभ आहे. योग्य वेळी माज ओळखणे, त्वरित रेतन सेवा मिळवणे व प्राण्याची व्यवस्थित काळजी घेणे यावरच गाभणदर (conception rate) अवलंबून असतो. पशुपालकांनी पुढील बाबींचे काटेकोर पालन करावे

- ➢ आपल्या गायी/म्हशींबाबत वंश, वय, दूधउत्पादन, मागील प्रसूती इतिहास, माजाची तारीख इ. संपूर्ण माहिती माहित असावी.
- ➢ माज ओळखण्याची क्षमता व अचुकता वाढण्याचे प्रयत्न पशुपालकांनी करावेत.
- ➢ माज अनियमित वाटल्यास किंवा बराच काळ माज न आल्यास **तत्काळ पशुवैद्यकाचा सल्ला घ्यावा.**
- ➢ माजावर असणाऱ्या जनावरांच्या बाबतीत चारा पाणी न देणे, बांधून ठेवणे, बसू न देणे, निरणाखाली डागणे अशा अघोरी प्रथा टाळाव्यात.

कृत्रिम रेतन कायदे आणि नियमन

कृत्रिम रेतनाच्या गुणवत्तेवर नियंत्रण ठेवण्यासाठी महाराष्ट्र शासनाने "महाराष्ट्र गोजातीय प्रजनन (विनियमन) अधिनियम, २०२३" लागू केला आहे.

या कायदयाची ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत -

(क) गोजातीय प्रजनन क्रियांचे विनियमन करणे;

(ख) रेत केंद्र, भ्रूण प्रत्यारोपण, प्रयोगनलिका (in-vitro) फलन प्रयोगशाळा, कृत्रिम रेतन प्रशिक्षण संस्था, सहयोगी जनन तंत्रज्ञान सेवा यांची प्राधिकरणाकडे नोंदणी करणे तसेच रेत बँक, कृत्रिम रेतन सेवा पुरवठाकार, कृत्रिम रेतन तंत्रज्ञ यांची जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्ताकडे नोंदणी करणे.

(घ) वळू प्रमाणित करणे.

(ङ) महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरणाची स्थापना करणे.

(च) प्राधिकरणाद्वारे निरीक्षण, झडती व जप्ती करण्याचा अधिकार.

(छ) या अधिनियमाच्या तरतुदीचे उल्लंघन केल्याबद्दल शास्ती

कायद्याची ठळक कलमे -

कलम ३- कोणत्याही व्यक्तीकडे अथवा संस्थेकडे नोंदणी प्रमाणपत्र असल्याशिवाय गोजातीय रेत, बीजांडे किंवा स्त्रीबीजपेशी यांचे उत्पादन संस्करण, साठवण, विक्री, वितरण व वापर करू शकणार नाही.

कलम ४- रेत केंद्र, इटी किंवा आयव्हीएफ प्रयोगशाळा (ET-IVF), कृत्रिम रेतन प्रशिक्षण संस्था, सहयोगी जनन तंत्रज्ञान सेवापुरवठादार व सहयोगी जनन तंत्रज्ञान तज्ञ यांनी प्राधिकरणाकडे नोंदणी करणे बंधनकारक.

कलम ५- रेत बँक,कृत्रिम रेतन सेवा पुरवठादार व कृत्रिम रेतन तज्ञ यांनी जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन यांच्याकडे नोंदणी करणे बंधनकारक.

कलम ६- नोंदणी प्रक्रिया व प्रमाणपत्र वैधता

कलम ७-नोंदणी प्रमाणपत्राचे नूतनीकरण

कलम ८-वळूचे प्रमाणीकरण

कलम १२- कलम १२ अन्वये "महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरण"ची स्थापना.

कलम १५ व **कलम १६**-प्राधिकरणाची कार्य व अधिकार

कलम १९- गोजातीय प्रजनन क्रियांशी राज्य शासनाने आणि केंद्र शासनाने वेळोवेळी निर्धारित केलेल्या गोजातीय प्रजनन क्रियांशी संबंधित असणाऱ्या विहित मानकांचे पालन करण्यात कसूर करील अथवा अधिनियमातील तरतुदीचे उल्लंघन करील अथवा त्याच्या विपर्यास करील त्या व्यक्तीस दोष सिद्ध झाल्यावर शिस्तीचा अधिकार.

कृत्रिम रेतन हे सर्वाधिक प्रभावी व शास्त्रोक्त तंत्र आहे. मात्र, या प्रक्रियेचे यश हे केवळ तांत्रिक कौशल्यावरच नव्हे तर कायदेशीर वनैतिक मुल्यांच्या पालनावरही अवलंबून आहे. म्हणून प्रत्येक पशुपालक, तंत्रज्ञ व संस्था यांनी महाराष्ट्र गोजातीय प्रजनन (विनियमन) अधिनियम २०२३ चे काटेकोर पालन करून, शास्त्रशुद्ध व रोगमुक्त प्रजनन प्रणाली विकसित करण्यासाठी योगदान द्यावे, हीच खऱ्या अर्थाने "**स्मार्ट आणि सस्टेनेबल पशुपालनाचा मार्ग**" आहे.

पशुसंवर्धन शब्दसंग्रह

हा केवळ शब्दांचा संग्रह नसून, विद्यार्थ्यांना पशुसंवर्धन, प्राणिशास्त्र, कृषीशास्त्र व ग्रामीण विकास या विषयांतील तांत्रिक शब्द समजून घेण्यास मदत करेल. स्पर्धा परीक्षांच्या दृष्टीने, विविध शासकीय योजनांशी संबंधित प्रश्नांमध्ये या क्षेत्रातील तांत्रिक संज्ञा वारंवार विचारल्या जातात. व्यवसायिक दृष्टीने, पशुपालक, दुग्ध व्यवसाय करणारे शेतकरी, पशुवैद्यक आणि संशोधक यांच्यासाठी हा शब्दसंग्रह एक प्रकारचा मार्गदर्शक आहे. याच्या साहाय्याने ते पशुपालनाशी संबंधित आधुनिक तंत्रज्ञान, आरोग्य व्यवस्थापन, प्रजनन, आहार व विपणन याबाबत सखोल ज्ञान आत्मसात करू शकतात. थोडक्यात, “पशुसंवर्धन शब्दसंग्रह” हा शैक्षणिक, स्पर्धात्मक आणि व्यावसायिक अशा तिन्ही स्तरांवर ज्ञान आणि व्यवहारा पूल मजबूत निर्माण करेल.

क्र.	इंग्रजी शब्द / Term	मराठी अर्थ / स्पष्टीकरण
१	Breeder / Parent stock	फलदायी अंडी तयार करणारे पालक पक्षी
२	Hatching egg	उबवता येणारे अंडे / फलदायी अंडे
३	Fertile egg	फलदायी अंडे – ज्यामधून पिल्लू विकसित होऊ शकते
४	Hatchability	उबवणक्षमता – फलदायी अंड्यांपैकी उबवले जाण्याचे प्रमाण
५	Broiler breeder	मांसासाठी पाळले जाणारे ब्रीडर पक्षी
६	Layer breeder	अंडी उत्पादनासाठी पाळले जाणारे ब्रीडर पक्षी
७	Brooding	पिल्लांना उब देणे व त्यांची प्राथमिक काळजी घेणे
८	Deep litter system	जमिनीवर गादी (भुसभुशीत साहित्य) टाकून पक्षी पाळण्याची पद्धत
९	Cage system	पिंजऱ्यात पक्षी पाळण्याची पद्धत
१०	Floor space	प्रति पक्षी आवश्यक जमिनीची जागा
११	Beak trimming / Debeaking	चोच छाटणे – पक्षी एकमेकांना इजा करू नयेत म्हणून
१२	Flock uniformity	कळपातील पक्ष्यांचे वजन आणि आकार एकसमान असणे
१३	Grading	कळपातील पक्ष्यांचे वजनानुसार वर्गीकरण करणे
१४	Body weight control	लक्ष्य वजन राखण्यासाठी आहार नियंत्रण
१५	Grower phase	वाढीचा टप्पा (७ ते १५ आठवडे)
१६	Pre-lay management	अंडी देण्यापूर्वीची काळजी (१६–२३ आठवडे)
१७	Lighting program	प्रकाश नियोजन – अंडी उत्पादनासाठी योग्य प्रकाशकाल ठरवणे
१८	Lux	प्रकाश तीव्रतेचे मापन (१ Lux = १ Lumen/m^2)
१९	Laying phase	अंडी देण्याचा टप्पा (२४–६८ आठवडे)
२०	Feed allowance	आहाराचे नियोजन व प्रमाण
२१	Egg weight	अंड्याचे वजन – उत्पादन स्थितीचे द्योतक
२२	Double yolk egg	दोन पिवळ्या असलेले अंडे
२३	Artificial insemination (A.I.)	कृत्रिम रेतन – नराचे वीर्य मादीत हाताने भरणे
२४	Semen	नर पक्ष्याचे / पशुधनाचे वीर्य
२५	Flock	एकाच वयाचे व जातीचे पक्ष्यांचा गट
२६	Vaccination schedule	लसीकरणाचे वेळापत्रक
२७	Mycoplasma test	मायकोप्लाझ्मा रोग तपासणी
२८	Salmonella test	सॅल्मोनेला (बॅक्टेरियल रोग) तपासणी
२९	Zoonotic disease	मानवाला पसरणारा प्राणिज रोग
३०	Deworming	कृमिनाशन – पोटातील परजीवी काढणे

लख्ख प्रकाशला तो अंबरसूत
माळरानी अवतरता हा वृषभसूत
ऐट तयाची ऐसि राजस
मनास भावे रुप लोभस !

महापशुधन वार्ता

महाराष्ट्र शासन
पशुसंवर्धन विभाग
पशुधन हिताय: बहुजन सुखाय:

माहे नोव्हेंबर-२०२५

प्रकाशक: पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र राज्य

वर्ष १ ले, अंक ७ वा, नोव्हेंबर-२०२५